
## कामगार अलिप्त, ग्रामीण विभाग शांतशांत

## मग गुजराथ जागवला - हलवला कुणी ?

# विद्यार्थी + मध्यमवर्ग



संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

१६ फेब्रुवारी १९७४

# माणूस

वर्ष : तेरावे । अंक : अडतीसावा

---

संपादक
माणूस

सप्रेम
नमस्कार....

अशोक
प्रभाकर
डांगेंची
खुर्ची
भलतीच
मार्मिक
आहे.
या अगोदरच्या
त्यांच्या कविताही
आवडल्या होत्या.
धन्यवाद !

फर्निचरवाला
असतो
तर
खुर्ची
कवितेची
फ्रेम करून
लावली असती.
मी एक
खुर्ची घालवून
बसलेला
असल्याने

खुर्चीची
ताकद जाणू
शकतो.
मी साध्या
चटईवर आलो
आहे.
डांगेतरी
खुर्चीवर
असतील अशी
आशा आहे.

–श्याम जोशी

---

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ५७३५९

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

४ फेब्रुवारी, ७४

◻ आपण आपल्या माणूस साप्ताहिकात ता. २६ जानेवारी ७४ चे अंकात पान २४ वर आमचेबद्दल एक्साईज बाबत जो मजकूर छापला आहे त्याबाबत मी आपणास खुलासा करू इच्छितो. सदर लेख श्री. रघुवीर मुळे या नावाने आहे.

वरील लेखात दिलेली माहिती वास्तवतेला धरून नसून ती संपूर्ण चुकीची व विपर्यस्त अशी आहे. आमच्या कंपनीबद्दल म्हणजे 'नासिक स्क्रू इंडस्ट्रि'बद्दल. त्याचा खुलासा मी खालीलप्रमाणे करीत आहे.

सुपरिटेंडेंट सेन्ट्रल एक्ससाईज A. G. नासिक यांनी आमच्या कारखान्यातील तयार होणारे उत्पादन करपात्र (Excisable) धरले होते व पूर्वीचे असिस्टंट कलेक्टर श्री. बोने यांनी आमच्या तीन कारखान्यांचे एकत्रिकरण केल्याची ऑर्डर ता. ९।९।७१ रोजी काढली होती. वास्तविक तिन्ही कंपन्या घटनेनी वेगळ्या असल्याने या अन्यायाविरुद्ध मुंबई येथील अपीलेट कलेक्टर सेन्ट्रल एक्साइज यांचेकडे अपील दाखल केले व ता. ३०-७-७३ रोजी अपीलेट कलेक्टर मुंबई यांनी आमच्या कारखान्यात तयार होणारा बराचसा माल एक्साइजेबल गुडस नाहीत असा निकाल दिला व तिन्ही कंपन्या वेगवेगळ्या युनिट धरले जावेत असा निकाल दिला. व ह्या निकालामुळे आम्हास गैरकायदा भरलेला रिफंड परत मिळाला आहे. सदरहू रिफंड मुंबईच्या अपीलाचे निकालामुळे मिळाला आहे.

आमचे कारखान्याविरुद्ध २० खटले भरल्याचे जे लिहिले आहे ते विपर्यस्त आहे. कारण आमचे विरुद्ध एकही खटला दाखल झालेला नाही.

वरील खुलासा मी आपणाकडे करीत आहे. आपण जो वरील लेख छापला आहे तो सर्वस्वी चुकीचा आहे. तरी वरील बाबतचा खुलासा आपण आपले येत्या अंकात करावा व ज्या अंकात आपण खुलासा प्रसिद्ध कराल तो अंक आमच्याकडे माहितीसाठी पाठवावा. कळावे.

**R. M. Mehta**
for Nasik Screw Industries,
Partner

१० फेब्रुवारी, ७४

◻ आज बरेच दिवसांनी माणूसचा (९ फेब्रु.) अंक विशेष आवडला. आतील सर्वच लेख चांगले आहेत. कविता मात्र मी समजू शकलो नाही. प्रा. पुष्पा भावे यांनी केलेली तेराव्या महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेविषयीची परीक्षणे वाचनात आली. त्यांनी 'गुरू'संबंधी जे परीक्षण केले आहे ते मोकळेपणाने केले नाही असे मला वाटते. त्यांच्या या परीक्षणाला मी व्यवस्थित उत्तर देऊ शकत नाही. कारण त्यांची झेप मोठी आहे. तरीसुद्धा मला आलेल्या शंका मी येथे उपस्थित करीत आहे.

त्या म्हणतात, 'गुरू'विषयी एवढे लिहिणे हे सुद्धा कागदटंचाईच्या काळात अप्रस्तुत वाटते.' तरीसुद्धा त्या जास्तीत

जास्त परीक्षण गुरूचेच करतात. त्याचप्रमाणे मुखपृष्ठावर देखील 'उषा कल्बाग'चे 'गुरू'मधील छायाचित्र छापून आपण उलट 'गुरू'लाच जास्त प्राधान्य देत आहात.

'...पण गुरूविषयी जे वातावरण निर्माण करण्यात आले होते त्यात नाटकातल्या कार्यक्षमतेविषयी मूलभूत गैरसमज होते. या गैरसमजुतीवर तीन परीक्षकांचे शिक्कामोर्तब करून परीक्षकांनी एक अत्यंत धोकादायक आदर्श पुढील वर्षाच्या स्पर्धेसाठी निर्माण केला आहे...' असे लिहून पुष्पाताई सरळसरळ परीक्षकांवर आरोप करीत आहेत की तुम्ही दिलेला निर्णय संपूर्ण चुकीचा आहे म्हणून.

वास्तविक मी स्वतः अंतिम नाट्यस्पर्धा पाहिलेल्या आहेत. त्या संपल्यावर आणि निकाल जाहीर झाल्यावर मी नियमित येणाऱ्या प्रेक्षकांशी हितगुज करून त्याचप्रमाणे परीक्षकांशी व इतरांशीदेखील बोलून पाहिले. मला त्यांनी दिलेल्या निर्णयाविरुद्ध कोणीही 'ब्र' देखील काढलेला आठवत नाही. दरवर्षी अंतिम स्पर्धेच्या निर्णयानंतर निर्णयावर वृत्तपत्रांतून व इतरही गदारोळ ओकण्यात येतो.

यंदा तसे झाले नव्हते. सर्वांनीच निर्णय एकमुखाने मान्य केला होता. आणि मला खरोखरीच बरे वाटले होते.

एवढे असताना केवळ आपण काहीतरी विरुद्ध बोलून 'लाऊन द्यावी' याच उद्देशाने तर प्रा. पुष्पा भावे यांनी वरील विधाने केली नसतील ना, अशी एक शंका उगाचच मनात जरूर घर करते.

त्याच परीक्षणात पुढे त्या म्हणतात. 'उद्या गुरुसारखी कृत्रिम, दिखाऊ नाटके निर्माण झाली तर त्याची जबाबदारी यंदाच्या परीक्षकांवर राहील.'

प्रथम पहाता गुरू हे नाटक तुम्हाला कृत्रिम आणि दिखाऊ वाटले याचा अर्थ सर्वांनाच तसे वाटेल असे नाही. याउलट सर्वात जास्त गर्दी 'गुरू' याच नाटकाला होती. आणि बहुसंख्य प्रेक्षकांना ते नाटक अतिशय आवडले आहे. बहुसंख्य प्रेक्षकांना आवडणारे आणि समजणारे नाटक जर कृत्रिम आणि दिखाऊ असेल आणि डोक्यावरून जाणारे नाटक जर अकृत्रिम आणि सुंदर, असा जर तुमचा समज असेल तर मग नाईलाज आहे.

वास्तविक नाटक हे जास्तीत जास्त प्रेक्षकांना समजले पाहिजे या मताचा मी आहे.

बरे तुम्ही अंतिम स्पर्धेवर परीक्षण करता याचा अर्थ सरळ सरळ अंतिम स्पर्धेच्या परीक्षकांवर तुम्ही वरील आरोप करीत आहात. परंतु सदर नाटक आळतेकर व कोल्हटकर स्पर्धेतही प्रथम आलेले आहे. याचा अर्थ आळतेकर व कोल्हटकर स्पर्धेच्या परीक्षकांनी देखील निर्णय चुकीचा दिला आहे, असे आपल्याला सांगायचे आहे काय ?

'साधारणतः पारितोषिक मिळविणाऱ्या संघाकडे आदर्श म्हणून पाहिले जाते, त्याचे अनुकरण केले जाते...' असे जे तुम्ही सांगत आहात, हे विधानही मला कुठेतरी खटकते आहे.

पृष्ठ ११ वर



# डॉ. जयकृष्ण यांची मुलाखत

—गोविंद पुरोहित

रूरकी विद्यापीठाच्या प्रशस्त व सुंदर आवारातून जाताना येताना 'कुलपती निवास' अशा छोट्या पाटीकडे सहज लक्ष जाते. याचे मुख्य कारण विद्यापीठाच्या भव्य इमारतीमध्ये ही छोटीशीच पण व्यवस्थित निगा राखलेली व त्याच्या भोवताली रम्य हिरवागार प्रसन्न परिसर असलेली ही इमारत आहे. या विद्यापीठाचे कुलपती (V. C.) डॉ. जयकृष्ण हे पुण्याला दि. १६ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या 'दि इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनियर्स' या इंजिनियर्सच्या अखिल भारतीय पातळीवरच्या ५४ व्या संमेलनाचे अध्यक्षपद भूषविणार आहेत. उद्घाटन करतील उपराष्ट्रपती डॉ. पाठक.

दि. २४ जानेवारीला डॉ. जयकृष्ण यांना एक अभिनंदनपर पत्र लिहून त्यात त्यांची भेट घेण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. दि. २५ ला सकाळी त्यांचे पत्र आले—डॉ. जयकृष्ण दुपारी साडेतीनला भेटू शकतील, कृपया अवश्य यावे.

प्रश्नांची रूपरेषा साधारणतः तयार होती. ते हिंदीत लिहून काढले, त्यांची वर्गवारी केली. काही दि इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनियर्सच्या संबंधी, काही इंजिनियरिंग शिक्षणाच्या संबंधी, विद्यार्थी असंतोषाच्या संबंधी काही, पॉलिटेक्निक शिक्षणक्रमासंबंधी काही व सर्वसाधारण सामाजिक परिस्थितीसंबंधी काही असे प्रश्न होते. डॉ. जयकृष्ण यांचा अनुभव जागतिक स्वरूपाचा असल्यामुळे काही प्रश्न त्यासंबंधीही होते.

कुलपती निवासाच्या सुंदर हिरवळीवर मोठ्या सावलीखाली अनेक फाइली टेबलावर घेऊन डॉ. जयकृष्ण बसले होते. मी व माझे मित्र केसकर समोर गेलो, त्यांचे अभिनंदन केले, पुष्पगुच्छ दिला.

मी त्यांना माझा परिचय करून दिला. 'माणूस'चे नाव सांगितले. माझ्या प्रश्नांचा कागद त्यांच्याकडे दिला.

हिंदीबाबतचे त्यांचे प्रेम मला विद्यापीठाच्या ग्रंथालयात दिसले होते. तुलसीदासांच्या 'रामचरितमानस'च्या चतुःशती समारंभवर्षानिमित्त अनेक प्रख्यात हिंदी ग्रंथ, ग्रंथालयात आत शिरल्याबरोबर दिसतात. सर्वप्रथम त्यांनी सारे प्रश्न बारकाईने वाचले व नंतर एकएक असे क्रमवार उत्तर देऊ लागले. संभाषण शक्यतो इंग्रजीत होते. उत्तरांचा सारांश खालीलप्रमाणे.

□

'दि इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनियर्स' सारख्या प्रचंड संस्थेत अध्यक्ष म्हणून प्रभावीपणे काम करण्यासाठी एक वर्षाचा कालावधी हा फार कमी आहे. या काळात काम करून आपली छाप संस्थेवर, तिच्या कार्यावर टाकणे शक्य नसते. तरीही खालील गोष्टी करण्याची माझी इच्छा आहे.

१ : उच्च गुणवत्तेचा पाठपुरावा, (High academic standards) संस्थेच्या कार्यक्रमांमध्ये उच्च गुणवत्तेचा पाठपुरावा मी सतत करीत असेन. अमेरिकन सोसायटी ऑफ इंजिनियर्स व तत्सम संस्थांची वार्षिक संमेलने ही असल्या मूलभूत आणि उच्च दर्जाच्या प्रबंधांनी व पेपर्सनी पुरेपूर भरलेली असतात. आपल्याकडेही याचा पाठपुरावा व्हावा.

२ : जागतिक सहकार्य : आपल्या संस्थेला जास्तीत जास्त जागतिक संघटनांकडून सहकार्य मिळवून देणाऱ्या अनेक योजना माझ्याकडे आहेत. त्यातून होणारे काम हे देशाच्या अनेक बाबतीत उपयोगी ठरेल.

३ : दि इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनियर्स ही एका विद्यापीठासारखी संस्था आहे. नुसत्या परीक्षा घेऊन AMIE सारख्या पदव्या देणे हे तिचे एकमेव काम नव्हे. इंजिनियरिंग करियरच्या सर्वांगिण विकासासाठी ही संस्था आहे. आहे. याची दृष्टी इंजिनियर्समध्ये दिसावी असा माझा प्रयत्न असेल. प्रत्येक काम कार्यवाहीत आणताना येणारी अडचण व त्यातून काढलेला मार्ग हा इंजिनियरिंगच्या विकासाचा मार्ग आहे. परंतु आपल्याकडे प्रत्यक्ष काम करणारे इंजिनियर कमी लिहितात. त्यांच्या अनुभवांची शिदोरी त्यांनी आपल्यापुरती मर्यादित का ठेवावी? तिला उच्च गुणवत्तेच्या स्वरूपात लिहून ती सर्व इंजिनियर्ससमोर ठेवण्याचे काम सेंटर्सनी करावे. दर्जाबाबत मात्र आपण दक्ष रहावयास हवे.

आज समाजसेवेची भावना लुप्त झाली आहे. स्वातंत्र्यापूर्वी ती फार मोठ्या प्रमाणामध्ये लोकांत होती असे मला वाटते. इन्स्टिटयूशनची अनेक सेंटर्स

आज ज्या प्रमाणात सामाजिक कामे करतात, त्यापेक्षा कितीतरी जास्त कामाची आवश्यकता आहे. सेंटर्सनी फक्त परिसंवादात व पेपर्समध्ये न गुरफटून राहता समाजाला उपयोगी कामे करावीत. संस्था असल्या कामात जनतेची फार मोठी सेवा करू शकते. समाजसेवेच्या या संदर्भात अगदीच मोफत हे काम करावे असेही मी म्हणत नाही.

आज ना उद्या आपल्याला इंजिनियरिंगचे ज्ञान हे राष्ट्रभाषेतून द्यावे लागेल. आपण इंग्रजी परिभाषा ज्या प्रमाणे भारतभर वापरतो त्याप्रमाणे हिंदी वापरता येईल व तो सुदिन जवळ यावा असे मला वाटते. याबाबत दुराग्रह नको. सामाजिक बदल म्हणून हा होऊ द्या. डॉ. रघुवीर यांनी याबाबत बरेच कार्य केले आहे. त्यात दोष आहेतही. अत्यंत कठीण शब्द आपल्याला सर्वदूर मान्य करविता येणार नाहीत. याबाबत संस्कृतचा मूळ रूपात प्रयोग जरूर व्हावा. त्या रूपांना मग दक्षिण भारतात विरोध तितका होणार नाही असे मला वाटते.

सबसेंटर्सची संख्या जितकी वाढेल तितकी चांगली, परंतु त्यांनी इमारतीमध्ये पैसे गुंतवू नये या मताचा मी आहे. तसेच कौन्सिलचा विस्तार हा जास्त मोठा आहे असे मला वाटते. मेंबर्सच्या वाढत्या संख्येबरोबर कौन्सिलचे सदस्य वाढविणे याला तसा अर्थ नाही. मग निर्णयांना फाटे फुटतात, प्रश्नांवर, उत्तरांवर एकमत होत नाही, या संदर्भात कौन्सिलमधील सदस्यांच्या संख्येवर बंधन असणे फार आवश्यक आहे.

¤

इंजिनियरिंग शिक्षणाचे ध्येय म्हणजे इंजिनिअरला दिले गेलेले काम त्याला परिपूर्णरितीने करता आले पाहिजे. या दिल्या गेलेल्या कामाच्या स्वरुपात कालानुसार बदल संभवतील. ३० वर्षांपूर्वी इंजिनियरला ड्रॉइंग्ज वाचणे व सांगितल्याप्रमाणे कामे करवून घेणे अपेक्षित होते. आजचा इंजिनियर वैज्ञानिक बैठकीवर ज्ञानाची उभारणी करतो. या दृष्टीने मॅनेजमेंटसारख्या कोर्सेससाठी प्रत्यक्ष कारखान्याच्या प्रात्यक्षिकाचा (सँडविच कोर्सेसचा) विचार फार चांगला आहे. त्यानिमित्ताने इंजिनियर दैनंदिन चालणाऱ्या कामाच्या जास्तीत जास्त जवळ येतो. वैज्ञानिक (sciences) विषयांबाबत मात्र असे म्हणता येणार नाही. डिग्री कोर्सेस मात्र यापुढे पूर्ण वैज्ञानिक पायांवर व डिझाइन ओरिएंटेड असावेत.

सुदैवाने आज देशात सुमारे १०–१२ अशा संस्था आहेत की ज्यातून मिळणारे शिक्षण जागतिक प्रगत शिक्षणाच्या संदर्भात खूपसे बरोबरीने आहे. आज आपल्याकडे फार मोठ्या प्रमाणावर शिक्षणाची संधी उपलब्ध आहे. अनेक शतकांची उणीव आपण भरून काढण्याच्या निर्धारात आहोत व याबाबत आपण स्पृहणीय कार्य केले आहे. शिक्षणाच्या झपाटणाऱ्या विस्ताराबरोबर त्याच्या गुणवत्तेकडे आपले



# डोकं दुखतंय ?

## प्रभावी आणि विश्वसनीय ॲनासिन त्वरित आराम देते



"माझं डोकं पुष्कळदा दुखतं. ॲनॅसिनपासून मला खराखुरा आराम मिळतो." बँकेत अधिकाराच्या जागेवर काम करणारे श्री. सुरेश देसाई यांचं हे मत.

**प्रभावी :** जगभर डॉक्टर्स ज्याची शिफारस करतात असे वेदनाशामक द्रव्य ॲनासिनमध्ये अधिक प्रमाणात असते. ॲनासिनमुळे वेदनांपासून त्वरित आराम मिळतो.

**विश्वसनीय :** श्री सुरेश देसाई सारख्या लक्षावधि व्यक्तींचा ॲनासिनवर विश्वास आहे. डॉक्टरांच्या बिनधोक औषधांसारखेच अनेक औषधींचे मिश्रण त्यात असते.

सर्दी-पडसे, फ्लू, डोकेदुखी, पाठदुखी, स्नायूदुखी आणि दातदुखी यांवर परिणामकारक.

प्रभावी आणि विश्वसनीय

**ॲनासिन**

भारतातले अत्यंत लोकप्रिय वेदनाशामक



Regd. User of TM : Geoffrey Manners & Co. Ltd.

दुर्लक्ष झालेले आहे. काही अंशी ते स्वाभाविक होते. तरीही आपण अर्धवट तयारीनिशी फार मोठे धाडस केले आहे असे वाटते. त्याचे परिणाम आपल्याला सहज दिसतात. Refinement, confidence मुळीच दिसत नाही. ती बाब फार आवश्यक आहे.
□

विद्यार्थ्यांच्या भडकत्या असंतोषाच्या संदर्भात तुम्ही दिलेली कारणे (नोकरीतील अशाश्वती, शिक्षणातून येणारी विफलता, मोडकळीस आलेली कुटुंबव्यवस्था, राजकारणासाठी विद्यार्थ्यांचा उपयोग, चारित्र्याचे बदलते सिद्धांत वगैरे) अगदी बरोबर आहेत. परंतु सर्वात मोठे कारण लोकसंख्येचा भस्मासूर हे आहे. १९४७ च्या सुमारास सुमारे ३ टक्के लोक सुशिक्षित होते. आज सुमारे ३० टक्के लोक सुशिक्षित आहेत. म्हणजे आपण सुमारे १० कोटी जास्त लोकांना शिक्षण दिले. आकडेवारीच्या दृष्टीने ही बाब चांगली आहे. परंतु दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा दर्जा काय होता? आपण शिक्षकांना असे काय दिले की ज्यामुळे त्यांनी जीव ओतून ही भावी पिढी तयार करावी? असे कोणते भव्य-दिव्य त्यांच्यापुढे होते? अक्षरशः काही नाही! याअर्थी हा पाया चुकीचा घातला गेला. आज ज्ञानात आत्मविश्वास आढळत नाही याची कारणे शोधण्यास दूर जाण्याची गरज नाही. साहाजिकच त्यातूनही जे कमी शिकलेले, ज्यांची लायकी कमी त्यांना नोकरी नाही, परिणती विध्वंसक वृत्तीत होणारच. योग्यता असो नसो आपण सर्वांना कॉलेजची दारे उघडी केली. प्रत्येकाने कॉलेजमध्ये गेलेच पाहिजे हा आपला आग्रह दिसतो तो चुकीचा आहे. परिणामी युनिव्हर्सिटी वेटींग रूम्स झाल्या! नोकरी मिळेपर्यंत शिकायचे. बी. ए. करा, नोकरी नाही, एम्. ए. करा, पुढे पी. एच. डी. करा हे सारे योग्यता असताना होते असे मला वाटत नाही. योग्यता नसलेला विद्यार्थी परीक्षेला बसला म्हणजे त्याच्या पेनमधून शाई न उतरता खिशातून सुरा निघेल यात शंका नाही. कॉलेज, कॉलेजशिक्षण प्रतिष्ठेचे प्रश्न बनवू नयेत.

तरुण मनाला आदर्शाची ओढ असते. याचा आपण राष्ट्रसेवेसाठी उपयोग करून घ्यावा. अनेकानेक प्रकारे ही सेवा करून घेतली जाऊ शकते. फक्त योजकता पाहिजे व कार्यक्रमाबद्दल प्रामाणिकपणा पाहिजे. सर्वप्रकारच्या सुट्या रद्द करून हे दिवस समाजसेवेसाठी – विद्यार्थ्यांच्या इच्छेने – वापरले जावेत. त्यांत दांभिकता नको. विद्यार्थी एक तर अभ्यास करीत असावा किंवा आपल्या बांधवांच्या कल्याणासाठी धडपडत असावा. या देशाच्या विस्ताराच्या मानाने या कामास गती मिळावी असे मला वाटते.

काही दिवसांपूर्वी आए. ए. एस. व इंजिनियर्स यांच्या अधिकारांवरून मतभेद उफाळून आले होते. त्यानिमित्त संप आदि प्रकार झाले. हे प्रकार दुर्दैवी होते असे मी मानतो. आपले लाखो

शेतकरी बांधव अक्षरश: शे-सव्वाशे रुपये वार्षिक पगारावर व तेही अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत राबतात. त्यांच्या मानाने आपण फार सुखी आहोत. त्यामानाने आपण काम किती करतो ? तो देशाचा खरा जीवनदाता आहे. त्याने उद्या संप केला तर आपल्याला जेवण्यासाठी भाकरीची विवंचना पडेल. संप वगैरे प्रकार आपल्या देशाला परवडणारे नाहीत. दुर्दैवाने आज कुणीही विचार करायला तयार दिसत नाही.

कोणत्याही प्रकारची भावी शिक्षणाची संधी कुणालाही नाकारणे हे प्रतिगामीपणाचे ठरेल. प्रत्येक योग्य (Deserving) अशा व्यक्तीला सर्व सोयी उपलब्ध हव्यात. संधी नाकारून

---

## पद्मभूषण डॉ. जयकृष्ण

डॉ. जयकृष्ण सध्या रूरकी इंजिनियरिंग विद्यापीठाचे कुलपती (v. c.) असून सिव्हिल व अर्थक्वेक इंजिनियरिंग या विषयातील तज्ज्ञ म्हणून जगभर प्रख्यात आहेत. प्रखर बुद्धिमत्तेच्या, विनम्र व सुंदर वक्तृत्व लाभलेल्या या व्यक्तीचा थोडक्यात परियच असा–

१९३२ मध्ये B. Sc. परीक्षेत सर्वोच्च गुणवत्ता पारितोषिक, १९३५ मध्ये रूरकी येतील, तेव्हाच्या थॉमसन इंजिनियरिंग कॉलेजमधून सर्वोच्च गुणात उत्तीर्ण होताना थॉमसन पारितोषिक व अन्य सुवर्णपदके. १९५२ मध्ये लंडन विद्यापीठाकडून डॉक्टरेट.

काही वर्षे सरकारी सार्वजनिक बांधकाम खात्यात नोकरी करून थॉमसन कॉलेजमध्ये प्राध्यापक, तिथे पदोन्नती होत होत १९६० साली अर्थक्वेक इंजिनियरिंग विभागाचे संचालक व १९७१ मध्ये रूरकी विद्यापीठाचे कुलपती (v. c.)

भूकंप अभियांत्रिकी हा आवडीचा व जिव्हाळ्याचा विषय. अनेक देशात या विषयावर व्याख्याने देण्यासाठी निमंत्रित प्राध्यापक.

महाराष्ट्रातील कोयना भूकंपाचा खास अभ्यास केलेला असून त्याबद्दल अधिकारपूर्ण विवेचन करणारे म्हणून ख्याती.

ISI च्या अनेक विभागातून कामे.

आत्तापर्यंत सुमारे साठ पेपर्स प्रसिद्ध केले आहेत. ' दि इंटरनॅशनल असोसिएशन फॉर अर्थक्वेक इंजिनअरिंग ' या जागतिक संघटनेचे १९६६ पासून आजतागायत अध्यक्ष.

त्यांच्या या बहुविध सेवेचा गौरव म्हणून राष्ट्रपतींनी १९७२ च्या प्रजासत्ताक दिनी त्यांना पद्मभूषण या बहुमानाने अलंकृत केलेले आहे.

---

आपण पुन्हा एक समाजद्रोही वर्ग मात्र निर्माण करू.

देशाच्या उज्वल भविष्याच्या दृष्टीने मी मुळीच साशंक नाही. मागील सव्वीस वर्षात आपण निःसंदेह प्रगती केली आहे. या प्रगतीची फळे आपल्याला त्या-प्रमाणात चाखायला मिळाली नाहीत याला लोकसंख्या वाढ हे प्रमुख कारण आहे. आज औद्योगिक निर्मितीमध्ये आपण जगात दहाव्या स्थानावर आहोत. सुंदर भारताबद्दल मी आशावादी आहे. फक्त जिद्दीचे प्रयत्न व शिस्तशीर काम आपण केले पाहिजे.

या देशाला सांस्कृतिक परंपरेचा थोर वारसा आहे. आपल्यापुढील अवघड प्रश्न थोड्याफार उशीरा का होईना पण आपण नक्की सोडवू शकू.

¤

सुमारे सव्वा तास चाललेला मुलाखतीचा कार्यक्रम संपत आला होता. दरम्यान बरेच कागद आणले व नेले जात होते. समोर एक प्रोफेसर सुमारे अर्धा तास बसलेले होते. चहा कॉफीच्या कार्यक्रमानंतर डॉ. जयकृष्ण यांच्या अध्यक्षीय कारकिर्दीला सुयश चिंतून, पुण्याच्या कार्यक्रमाबद्दल शुभकामना व्यक्त करून त्यांचा मी निरोप घेतला.

● ● ●

---

## सप्रेम नमस्कार : पृष्ठ ४ वरून

खराखुरा कलाकार कशाचेही अनुकरण करीत नाही. आणि केवळ स्पर्धेत बक्षिस मिळविणे हाच उद्देश त्याने डोळ्या-समोर ठेवलेला नसतो. मागच्या वर्षीच्या प्रथम नाटकाचे अनुकरण केल्याने पुढील वर्षी जर प्रथम पारितोषिक मिळत असेल तर असे करणे एकदम सोपे आहे.

परंतु आजचा कलाकार, प्रेक्षक दुधखुळे नाहीत. त्यांना चांगले काय आणि वाईट काय हे बरोबर समजते. दरवर्षी नाटक सादर करण्याचा ओघ बदलत असतो. त्याचप्रमाणे परीक्षकांचा दृष्टिकोनही बदलत असतो. स्वतः परीक्षक दरवर्षी बदलत असतात. 'तेव्हा गुरूसारखी कृत्रिम, दिखाऊ नाटके निर्माण झाली तर त्याची जबाबदारी यंदांच्या परीक्षकांवर राहील' हे विधान मला पटत नाही.

सुधाकर फडके
'रसरंग' प्रतिनिधी
ठाणे व मुंबई परिसर

पुरोगामी वाचकांसाठी
एक नवे प्रकाशन

# रसेलचे निवडक लेख

विसाव्या शतकातील सर्वश्रेष्ठ विचारवंत म्हणून गौरविल्या जाणाऱ्या बर्ट्रँड रसेलच्या महत्त्वाच्या परंतु अ–तांत्रिक, स्फोटक निबंधाचा प्रा. भा. ज. कविमंडन यांनी केलेला मनोवेधक अनुवाद. सोबत रसेलच्या कार्याची तोंडओळख करून देणारी विवेचक प्रस्तावना. प्रत्येक सुशिक्षित वाचकाने संग्रही बाळगण्याजोगे एक सुटसुटीत आणि महत्त्वाचे पुस्तक.

पृष्ठे २३२ — किम्मत पंधरा रुपये

**कॉन्टिनेन्टल प्रकाशन**
विजयानगर कॉलनी
पुणे ४११ ०३०

# सो ल क ढी

## मुंबई विद्यापीठातील (त्र्यं)बकध्यान

मुंबई विद्यापीठ केवळ भारतातलेच नव्हे तर जगातले एक महान विद्यापीठ आहे ही गोष्ट एक 'महाराष्ट्र टाईम्स' सोडता, बाकी सगळ्यांना मान्य आहे असे दिसते. 'शीलवृत्तफला विद्या' या आपल्या ध्येयवाक्याला जागून मुंबई विद्यापीठाने आजवर लाखो चारित्र्यवान पदवीधर निर्माण केले आहेत. त्यामुळे या आपल्या देशात अन्य कसलाही दुष्काळ पडला तरी चारित्र्याचा दुष्काळ कधीही पडणार नाही. मुंबई विद्यापीठाला ही किमयागारी सहज साधू शकली, कारण मुंबईत संस्थाचालनाच्या फार उज्वल परंपरा गेल्या शंभर वर्षांत निर्माण झाल्या आहेत. मुंबई विद्यापीठ आणि त्याच्या अखत्यारीतील महाविद्यालये यांचा कारभार कसा धुतल्या बाजरीसारखा स्वच्छ स्वच्छ आहे. त्यामुळे येथे असंतोषाला स्थान नाही. येथे सारे कसे शांत शांत आहे.

गेल्या काही वर्षांत तर या शांततेला एक विशेष सांस्कृतिक मूल्य प्राप्त झाले आहे. त्याचे श्रेय अर्थातच भूतपूर्व उपकुलगुरु न्या. गजेंद्रगडकर आणि वर्तमान उपकुलगुरु त्र्यंबकतात्या कृष्णाजी टोपे यांना द्यायला हवे. या दोघांची विद्वत्ता, सेवापरायणता, धडाडी, उपक्रमशीलता, ध्येयासक्ती, औदार्य, दूरदृष्टी यांच्यामुळे मुंबई विद्यापीठाला एक आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त झाला आहे. जगातल्या कोणत्याही विद्यापीठाच्या विद्यार्थ्यापेक्षा मुंबई विद्यापीठाचा विद्यार्थी ज्ञानाने आणि चारित्र्याने वरचढ ठरतो याचे इतरेजनांना आश्चर्य वाटले तरी आम्हाला मात्र ती गोष्ट योग्य, उचित आणि स्वाभाविकच वाटते. मुंबई विद्यापीठाच्या निर्दोष कारभाराची ती एक नैसर्गिक, तर्कसंगत आणि अपरिहार्य परिणती आहे, असेच आम्ही मानतो.

त्यामुळेच परवा मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी पूर्वपरीक्षा रद्दबातल करून घेण्यासाठी जेव्हा मनगटी आंदोलन केले तेव्हा आम्ही अंमळ विस्मयचकित झालो. ज्या विद्यार्थ्यांना कागदाचे बाण नीट मारता येत नाहीत, तासांना दांड्या बेमालूम मारता येत नाहीत त्यांनी इतकी मजल मारावी म्हणजे कमाल आहे. पूर्वपरीक्षा कसोशीने घेण्याची विधायक पद्धत आज अनेक वर्षे मुंबई विद्यापीठात रूढ आहे. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने ती काहीशी गैरसोयीची आहे. कारण पूर्वपरीक्षेत समाधानकारक प्रगती दाखवू न शकणाऱ्या विद्यार्थ्याला विद्यापीठाच्या परीक्षेला पाठवण्यात येत नाही. एकापरीने त्याच्या हक्काची पायमल्लीच होते. म्हणून आंदोलन.

पण विद्यार्थ्यांनी आंदोलन केले म्हणून काही मुंबई विद्यापीठ गांगरून गेले नाही. परिस्थितीचा बरोब्बर वेध घेऊन सकलार्थसाधक निर्णय तत्परतेने घेण्याची अद्‌भुत हातोटी मुंबईतील महाविद्यालयांच्या प्राचार्यांना आणि उपकुलगुरूंना साधली आहे. लोकशाही संकेताचा मान राखून त्यांनी एक सभा घेतली आणि शिक द्यावी इतक्या सहज पूर्वपरीक्षा ऐच्छिक करण्याचा निर्णय घेऊन टाकला. झाले. मनगटे सरसावीत आलेले विद्यार्थी मनगटे चावीत बसले.

परंतु मुंबईच्या शैक्षणिक आरोग्याची काळजी वाहाणाऱ्या काही जबाबदार आरोग्याधिकाऱ्यांना मात्र प्राचार्यांचे आणि उपकुलगुरुंचे वर्तन अत्यंत आक्षेपार्ह वाटले. ३२५ प्राध्यापकांनी निवेदन काढून खेद व्यक्त केला; संपादकांनी अग्रलेख लिहिले; कर्तव्यदक्ष नागरिकांनी पत्रे लिहिली. (त्यात पूर्वीचे एका महाविद्यालयाचे प्राचार्य आणि हल्लीचे एक कर्तव्यदक्ष नागरिक श्री. गंगाधर गाडगीळ यांचे एक पत्र आहे. त्यात, मुंबई विद्यापीठात सारा भ्रष्टाचार हो आहे; सज्जनहो, त्याला वेळीच वाचवा, असा टाहो फोडला आहे– उगी गंगू बाळ उगी.) पूर्वपरीक्षा ऐच्छिक केल्यामुळे विद्यार्थी आपले अभ्यास करायचे विहित कर्तव्य वाऱ्यावर सोडतील, महाविद्यालयातील गांभीर्याचे आणि शिस्तीचे रायते होईल, असा या आरोग्याधिकाऱ्यांचा अंदाज आहे. ते विशेष व्यथित झाले. कारण त्यांना असे प्रामाणिकपणे वाटते की उपकुलगुरूंनी प्रस्तुत निर्णय विद्यार्थ्यांना घाबरून घेतलेला आहे.

येथे मात्र त्यांची माणसाची पारख चुकली असे मला प्रामाणिकपणे वाटते. उपकुलगुरू त्र्यंबकतात्या कृष्णाजी टोपे हे केवळ कर्तृत्त्वानेच नव्हे तर देहानेसुद्धा ऐसपैस उत्तुंग आहेत. त्या विशाल देहमनात कोतेपणा, स्वार्थ, संधिसाधूपणा, टरकूपणा यांना थारा नाही. शिवाय आपल्या नसानसातून तात्या टोपेंचं क्रांतिकारक रक्त खेळते आहे, याचे उपकुलगुरूंना क्षणभरही विस्मरण होत नाही. (१९६० साली प्रसिद्ध झालेले 'द कॉन्स्टिटयूशन ऑफ इंडिया' हे स्वतःचे पुस्तक त्यांनी आपले थोर पूर्वज सेनापती तात्या टोपे यांना अर्पण केले आहे, हे आपले लक्षात असू द्या.) घबराटीची शक्यता अशी मुळातच नष्ट झाल्यावर आपल्या असे लक्षात येते की उपकुलगुरूंनी पूर्वपरीक्षा ऐच्छिक करण्याचा निर्णय घेताना दुर्मिळ असे धैर्य दाखवले आहे. या निर्णयामुळे स्वयंस्थापित शिक्षणतज्ज्ञ आपल्याविरुद्ध काळे काहूर उठवतील हे काय टोप्यांना कळलेच नसेल? पण असे काहूर काय किंवा परीक्षा काय या अशाश्वत गोष्टी आहेत; शिक्षण, चारित्र्य आणि विद्यार्थीहित या गोष्टी शाश्वत आहेत, कदर करायची ती याच गोष्टींची, असा नेमका मूल्यविवेक या धीरगंभीर उपकुलगुरूंनी केला असला पाहिजे. आजचे शिक्षण आणि आजचा विद्यार्थी परीक्षेसारख्या वातड गोष्टीशी जखडून राहिला होता. त्याला परीक्षेपासून मुक्त

करून खऱ्या आणि अर्थपूर्ण विद्याभ्यासाला सन्मुख करण्यासाठी उपकुलगुरूंनी हे पहिले पाऊल टाकले आहे, असा त्या निर्णयाचा अन्वय मी लावतो आणि त्याचे मनःपूर्वक स्वागत करतो. मुंबई विद्यापीठात अवतरणाऱ्या क्रांतीची मंगल प्रभात झाली आहे. तिचे सूक्तकार म्हणून उपकुलगुरू त्र्यंबकतात्या कृष्णाजी टोपे यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर होऊन राहील. म्हणूनच त्यांच्या नावावर कोटी करून त्यांना मुंबई विद्यापीठातील (त्र्यं) बकध्यान म्हणणाऱ्यांची मला कीव वाटते. ◻

## पोट निवडणुकीचा ठसका

तीनचार पिढ्यांमागे प्लेग हा आपल्या मंडळींचा एक आवडता चर्चाविषय होता प्लेगची जागा हल्ली निवडणुकीने घेतली आहे. तुमच्या-माझ्या जवळपास कोणती ना कोणती निवडणूक दुमदुमत असते. तिच्याबद्दल बोलणे हे नागरिक या नात्याने आपले कर्तव्यच असते. आणि आपण बाकी कुठल्याही गोष्टीत कसूर केली तरी कर्तव्यात कधीच कसूर करीत नाही. निवडणूक राजकीय असली तर आपल्या बोलण्याला एक विशेष खमंग स्फुरण चढत असते. काही दिवसांपूर्वी मध्यमुंबईत पार पडलेल्या लोकसभेच्या पोटनिवडणुकीने ही गोष्ट पुन्हा एकदा ठामपणे सिद्ध केली आहे.

या पोटनिवडणुकीबद्दल काही लिहायचे नाही, असे मी ठरवून टाकले होते. कारण मी एक हाडाचा भित्रा पत्रकार आहे. आपण शाईने लिहायचे आणि लोकांनी त्याला रक्ताळलेले शीर्षक द्यायचे, ही हौस मला परवडण्यासारखी नाही. लोकांना आवडेल तेच बोलायचे, लिहायचे आणि आचरायचे असा माझा बाणा आहे; आणि त्यासाठी सर्वस्वपणाला लावायची माझी तयारी आहे. असो. स्वतःबद्दल फार बोलणे वृत्तपत्रनीतीला शोभणारे असले तरी ते माझ्या खासगी आणि वैयक्तिक नीतिमत्तेला शोभणारे नाही. असो.

मध्यमुंबईतील लोकसभेच्या या पोटनिवडणुकीने बऱ्यापैकी धमाल उडवली. प्रत्येक उमेदवाराला निवडून येण्याची खात्री होती; आणि निवडून येण्याचे भाग्य कोण्या एकाचेच असते हे नीटसे ध्यानात न राहिल्यामुळे उमेदवारांच्या हजारो प्रचारसभा छान रंगल्या. निकाल काय लागेल याबद्दल जनतेने जवळपास एकच एक होरा निश्चित केला होता; तो उसवला जाऊ शकेल हे कोणाला फारसे सुचलेच नव्हते. अशा परिस्थितीत, अनपेक्षितपणे, रोझा देशपांडे निवडून आल्या आणि आल्या आल्या होल बॉम्बेमध्ये धुरोळा उडाला. या धुरोळ्याने अनेकांना जन्माची अद्दल घडावी असे ठसके लागून राहिले आहेत. धुरोळा अजून खाली बसलेला नाही. (तो वरच उधळलेला राहील यासाठी संबंधित मंडळी प्रयत्नशील आहेत,) ठसका अजून थांबलेला नाही.

या पोटनिवडणुकीत मतदान अडतीस टक्के झाले. असे टक्केटोणपे खात तगून राहिलेल्या भारतीय लोकशाहीला आपण वंदन करू या. ● ● ●

चिमणभाई कल्पनेपेक्षा फार लवकर कोसळले. त्यामुळे दोन अंकात हा गुजराथचा आँखो देखा हाल द्यायचा होता तो या एका अंकातच देऊन विषय आटपावा लागत आहे.

गुजराथची खास वार्तापत्रे यापूर्वी दोनदा माणूसने दिली. हिंदु-मुस्लिम दंगली झाल्या तेव्हा शरद गोखले यांनी लिहिलेली. त्यानंतर काँग्रेस फाटाफुटीनंतर जुन्या काँग्रेसच्या अधिवेशनानिमित्त श्री. ज. जोशी आणि वि. शं. पारगावकर ही लेखकांची जोडी अहमदाबादला जाऊन आली तेव्हा. वाचकांनी त्यावेळी या सर्व लेखांचे – वार्तापत्रांचे खूप स्वागत केले होते. 'छायाबेन' यांच्या या प्रदीर्घ वार्तापत्राचेही असेच स्वागत होईल अशी खात्री वाटते.

एका अंकात वार्तापत्र द्यावे लागल्याने इतर विषयांना मात्र जागा राहिली नाही. पण विषयाचे ताजेपण टिकवण्यासाठी हे अधूनमधून करावे लागते. पुढच्याही अंकात हे करावे लागणार आहे– माणूस प्रतिनिधी सु. ल. सोमण उत्तर प्रदेशहून नुकतेच परतलेले आहेत. पुढच्या अंकात ते आपला उत्तर प्रदेशचा निवडणूक अहवाल सादर करतील –असाच प्रदीर्घ आणि अनेकांच्या भेटीगाठींवर आधारित. पुढच्या अंकाची किंमतही यामुळे अधिक ठेवावी लागणार आहे. नवीन काही करायचे तर अफाट खर्च होतोय. आजचे हिशेब उद्या खोटे ठरताहेत. सगळीच अनिश्चितता आहे एकूण. कागदाची भाववाढ तर भीषण आहे...

हिंदुस्थानचा गुजराथ होईपर्यंत हे असेच चालू राहाणार की काय ? आणि नंतर तरी काय ?

वाचक ही सर्व परिस्थिती जाणून घेतील व माणूसला यापुढे वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या बदलांकडे सहानुभूतीने पाहातील अशी आशा आहे. –संपादक.

---

# अहमदाबाद दिनांक...

छाया दातार

---

# दिनांक ३० जानेवारी १९७४

गुजरात मेल ठीक ७ वाजून २० मिनिटांनी अहमदाबाद स्टेशनवर पोचली. २० जाने. ला रात्री अहमदाबादमध्ये लष्कराला बोलावण्यात आल्याची बातमी होती. बाहेर सध्या काय घडत असेल, घरी इतक्यात जायला मिळेल की नाही, कर्फ्यू किती वाजता उठेल, याचीच गाडीत चर्चा चालू होती. वाटलं होतं, गुजरातच्या दंगलीच्या बातम्या ऐकून बरेच लोक प्रवास रद्द करतील आणि गाडीला गर्दी कमी असेल. पण प्रत्यक्षात तसं काहीच आढळलं नाही. गाडी बऱ्यापैकी भरलेली होती. अहमदाबादच्या आधी दहा मिनिटे मणिनगर, उपनगर लागतं. तेथे काही कामगार डब्यात शिरले. हातात खाण्याचे डबे होते. तेव्हाच कळलं, कर्फ्यू असला तरी कारखाने चालू आहेत आणि कामगारांना त्यांच्या नोकरीचे कार्ड दाखवून रस्त्यावरून जायला परवानगी मिळते. पहिले दोन दिवस मात्र ही सवलत जाहीर केली गेली नव्हती. त्यामुळे कारखाने बंदच राहिले. नंतर मात्र मुख्यमंत्री आणि मालकवर्ग यांच्यात बातचीत झाली. उत्पादन थांबवून कसं चालेल ! आधीच देश आर्थिकदृष्टया आणीबाणीच्या काळातून जातोय ! आणि मला वाटतं, मंत्रिमंडळाला ही भीती असतेच. रिकामा कामगार उद्या आवरायला जड जाईल. विद्यार्थी आणि कामगार यांची युती म्हणजे शनी मंगळाचीच युती.

स्टेशनवर गाडी पोचता पोचताच सूचना ऐकू आली, 'बाहेरगावाहून येणाऱ्या प्रवाशांसाठी खास कर्फ्यू पासेस देण्याची व्यवस्था प्लॅटफॉर्मवरच केलेली आहे. कृपया तिचा फायदा घ्यावा.' अर्थात बाहेर सार्वजनिक वाहने पळत नव्हतीच. तेव्हा या सोयीचा फायदा फक्त पायी जाऊ शकणारे आणि खाजगी मोटारगाडीवाले यांनाच घेता येण्याजोगा होता. माझे यजमानपण डॉ. मावळंकर करणार होते. त्यामुळे मी निर्धास्त होते. गाडीत बसून स्टेशनच्या आवाराबाहेर पडता पडता सारं सामसूम असल्याचं लक्षात आलं. इट वॉज लाइक अ डेड सिटी. पण लष्कराचं अस्तित्व कोठेच जाणवेना. मी प्रश्न विचारणार इतक्यात समोरून लष्कराची पेट्रोल व्हॅन येताना दिसली. बंदुका सरसावून सैनिक उभे होते. गस्त घालीत, टेहळणी करीत, हळूहळू जीप पुढे सरकत होती. आमची गाडी थोडी पुढे गेली तोवर दोघा जवानांनी अडविलेच. कर्फ्यू पासेसची चौकशी वगैरे उपचार झाले आणि पुन्हा एकदा भर्रर् आवाज करीत गाडी सुरू. म्हणजे प्रकरण बऱ्यापैकी गंभीर होते. तरी मी चौकशी केलीच, हा मार्शल लॉ नव्हता.म्हणजे लष्कराच्या

ताब्यात सत्तासूत्रे सोपविली गेली नव्हती. अजूनही नागरी सत्ता कायम होती. फक्त लष्कराला मदतीला बोलावले होते. पोलीसयंत्रणा अकार्यक्षम म्हणा किंवा कमी पडली म्हणून म्हणा, लष्कराची गरज भासली होती आणि कर्फ्यू लष्कराने मार्शल लॉखाली लादलेली नसून ही पोलीस कर्फ्यू होती. पुढे दोन दिवसतात या विषयावर बरीच चर्चा ऐकायला मिळाली. मार्शल लॉच्या कर्फ्यूमध्ये 'शूट ॲट साइट' ही ऑर्डर देता येते. पोलीसला हा अधिकार नसतो. पोलीसकर्फ्यूमध्ये गुन्हेगार व्यक्तीला पकडून कोर्टापुढे उभे करून कोर्टाला शिक्षा सुनावण्याचा अधिकार असतो. हा महत्वाचा फरक होता. आणि गुजरातमध्ये खुद्द चिमणभाई पटेलांच्या भाषणामध्ये ह्याची जाणीव आढळली नाही. लष्कर येण्याच्या आदल्या दिवशी आकाशवाणीवर झालेले चिमणभाईंचे भाषण मोठ्या गुर्मीत होते अशी टीका होती. 'शूट ॲट साइट'चा आदेश लष्कराला दिला असल्याची जाहीर धमकी होती आणि यावर कोर्टात खटलाही भरला गेला होता. तेव्हा हे सर्वच प्रकरण बरंच गाजणार होतं.

या माहितीमुळे मला हायसं वाटलं. मला पत्रकाराचा स्पेशल कर्फ्यू पास मिळून भटकता येणार होतं. घरी गेल्या गेल्याच फोनची तबकडी फिरवायला सुरुवात केली. कर्फ्यू उठेतोवर तेवढेच करता येण्याजोगं होत. एक गोष्ट चांगली झाली, मावळंकराच्या घरातच 'नवनिर्माण युवक समिती'चे दोन सभासद निघाले. चहाच्या पहिल्या घोटाबरोबरच आंदोलनाची सूत्रे हाती लागायला सुरुवात झाली. मुंबईच्या वृत्तपत्रांतून वाचलेली काही नावे, त्रोटक वृत्तांत, गोळीबाराच्या भन्नाट वार्ता एवढीच माझी शिदोरी होती.

आनंद मावळंकर एच. के. आर्टस् कॉलेजचा विद्यार्थी आणि सतीश मावळंकर लॉ कॉलेजचा विद्यार्थी. त्यांनी पुन्हा पुनः ठासून सांगितलं की, अहमदाबादचा विद्यार्थी आजच जागरूक झालाय असं नाही. आजपर्यंत जेव्हा जेव्हा अधिकार मिळविण्याचा प्रश्न आला तेव्हा तेव्हा हा विद्यार्थी एकत्र आला. एकजूट केली आणि मागण्या मिळवूनच थांबला.

'पण भ्रष्टाचार बंद करो! चिमणभाई मंत्रिमंडळको हटा दो। ही त्यांची मागणी राजकीय आहे आणि राजकीय दृष्ट्या तो जागृत कसा काय झाला? यामध्ये नक्की कोणा राजकीय पक्षाचा हात असला पाहिजे.'

'हा तुमचा आरोप मात्र कोणी विद्यार्थी मान्य करणार नाही. या वेळच्या आंदोलनाचे हेच वैशिष्ट्य आहे. विद्यार्थ्यांनी संपूर्णतया मुक्त आणि स्वतंत्र राहून हे आंदोलन चालवायचे ठरविले. कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्यांना त्यांनी आपल्या प्लॅटफॉर्मवर येऊ दिले नाही.'

'फारच उत्तम' आमचे संभाषण हिंदी – इंग्रजीतून पुढे सरकत होते. मावळंकर मंडळी पुरती गुजराथीमय होऊन गेली आहेत. ते बोलतात गुज-

राथी, लिहितात गुजराथी, वाचतात गुजराती एवढंच काय त्यांना स्वप्नंही गुजराथीच पडतात. विशेषतः ही पुढची पिढी.

'चिमणभाई मंत्रिमंडळ येण्यापूर्वी तुम्हाला आठवत असेलच, येथे बराच संघर्ष निर्माण झाला होता. घनश्याम ओझाला यांनीच कोसळवलं. मग कांतीलाल घिया गट आणि चिमणभाई गट यांची रस्सीखेच सुरू झाली. सगळे जण दिल्लीची वारी करायला लागले. शेवटी निर्णय द्यायला स्वर्णसिंग खास दूत म्हणून येथे आले. जुलै १९७३ मध्ये त्यावेळीसुद्धा आम्ही विद्यार्थी, प्राध्यापक मंडळी मिळून 'युवक नागरीक समिती' स्थापन केली होती. स्वर्णसिंगांना आम्ही काळी निशाणे दाखविली. निदर्शने केली. आमची मागणी एकच होती–

'स्वच्छ लोकशाही पाहिज. भ्रष्टाचारी लोकांना दूर ठेवा.'

'अच्छा म्हणजे, चिमणभाई मंत्रीमंडळाबद्दलची नाराजी तेव्हापासूनच आहे तर.'

'चिमणभाई ज्या पद्धतीने मुख्यमंत्री बनले तो सगळाच प्रसंग घृणास्पद आहे, आणि हे आमच्या विद्यार्थ्यांपुढे आदर्श! पण त्याहीपेक्षा मुख्य म्हणजे चिमणभाई प्रथमपासूनच गुजराथ विद्यापीठाच्या कारभारात फारच हस्तक्षेप करतात. यावेळचे उपकुलगुरु श्री. ईश्वरभाई पटेल हे त्यांचेच पित्तू. विद्यार्थ्यांना त्यांचा भयंकर राग–' आनंद मावळंकर तसा शान्त मुलगा. गांधी पीस फाऊंडेशनचा समासद. पण तोही चिमणभाईबद्दल चिडून बोलत होता.

हे फार इंटरेस्टिंग दिसतंय्. आमच्या मुंबईच्या विद्यार्थ्यांना हे सर्व सांगायला पाहिजे. लेकाचे फक्त पॅन्टच्या बॉटमचा घेर १४ इंच घ्यायचा की १० इंच यावर आंदोलने करतात. फारतर प्रिलीम परीक्षा हवी की नको येथपर्यंत यांची मजल. असं करू या, आपण पहिल्यापासून सुरुवात करू. आंदोलन चालू व्हायला निमित्त काय झालं? पहिल्या बंदचे आवाहन कोणी केले? वगैरे वगैरे.'

'छायाबेन, मी तुम्हाला सांगतो नीट. कसे कसे प्रसंग घडले ते.' सतीश मावळंकर पुढे सरसावला.

'बाय दि वे, तू नवनिर्माण समितीच्या ॲक्शन कमिटीचा समासद आहेस का?'

'नाही. त्यात फक्त सिनेटचे समासद आणि प्रत्येक कॉलेजचे जी. एस. (उर्फ जनरल सेक्रेटरी) आहेत. काही इतर विद्यार्थी सघटनांचे प्रतिनिधी वगैरे पण विद्यार्थी प्रतिनिधी 'मनीषी जानी' माझा चांगला मित्र आहे. त्यालाच आता M. I. S. A. खाली पकडलंय. इतरही अनेकजण.'

'ओ हो, त्याचे नाव मुंबईच्या वर्तमानपत्रातसुद्धा वाचल्याचे आठवतंय. तू या ॲक्शन कमिटीच्या कोणाशी तरी माझी गाठ घालून देशील का?'

प्रयत्न करतो. कारण ५–६ जण पकडले गेलेत. बाकीचे अंडरग्राऊंड झालेत. त्यांच्यावर वॉरंट आहे आणि ७२ तासांच्या आत ते जर पोलीस कमिशनरच्या ऑफीसात हजर झाले

नाहीत तर त्यांच्यावर क्रिमिनल अॅक्ट खाली खटले भरले जातील असं सरकारने आजच्याच वृत्तपत्रात जाहीर केलंय.'

'बापरे, म्हणजे या एवढ्याशा चिमुरड्या पोरांना सरकार बरंच घाबरतंय तर! मग भेटलंच पाहिजे यांच्यापैकी कोणाला तरी, ते बोलतात कसे, रहातात कसे, विचार कसे करतात बघितलंच पाहिजे.'

'छायाबेन, या मुलांनीच तर चिमणभाई मंत्रीमंडळाचे आसन हादरायला सुरुवात केली.'

'का, जनसंघाने तर डिसेंबरपासूनच भाववाढ विरोधी आंदोलनांना सुरुवात केली होती ना!'

'नाही हो, कुठेतरी छोटासा मोर्चा वगैरे असेल. पण आजच्या भाववाढीचे कारण भ्रष्टाचार आहे. अन्नाचा दुष्काळ हा मानवनिर्मित आहे आणि याला कारण चिमणभाई आहे हे विद्यार्थ्यांनीच स्पष्ट रूपाने जाणले आणि चिमणभाई मंत्रिमंडळ आम्हाला नको अशी मागणी केली. तेव्हा कुठे चिमणभाई सरकार खडबडून जागे झाले.'

'मागणी तर मोठी रोखठोक आहे! पण विद्यार्थ्यांना हे सुचले कसे? रोजच्या अभ्यासक्रमात, दैनंदिन कार्यक्रमात या भ्रष्टाचाराची जाणीव झाली कशी?'

सतीश मावळंकरने थोडक्यात पार्श्वभूमी सांगितली ती अशी—

पहिले निमित्त झाले मोरवीच्या इंजिनिअरिंग कॉलेजमधील हॉस्टेलवर रहाणाऱ्या विद्यार्थ्यांचे जेवणाचे बिल जास्त झाले त्याचे. मोरवीचे विद्यार्थी पहिल्यापासूनच दंगा करणारे, खळबळ माजविणारे. त्यांनी जाळपोळ केली. पोलिसांनी त्यांच्यावर लाठीमार केला. गोळीबार झाला. पुढे ७–८ दिवसांत अहमबादमधील एल. डी. इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये तसाच प्रसंग घडला. बाकीच्या कॉलेजच्या हॉस्टेलचे मेसबिल ७० रु. होते. इंजिनिअरिंग कॉलेजमध्येही नोव्हेंबरचे बिल ७० रु च्या आसपास होते. डिसेंबर अखेरीस बिल आले ११० रु. विद्यार्थ्यांनी रेक्टरला जाब विचारला. रेक्टरने कॉन्ट्रक्टरला स्पष्टीकरण मागितले. कॉन्ट्रक्टरने बाजारभावांकडे बोट दाखविले. आतापर्यंत रेशनचा कोटा मिळायचा. तो बंद झाला होता. खुल्या बाजारातून धान्य घ्यावे लागले. विद्यार्थी खवळले. रेक्टरची उत्तरे बेजबाबदारपणाची वाटली त्यांना आणि भडकलेल्या विद्यार्थ्यांनी रेक्टरचे घरी नासधूस केली. हॉस्टेलचे फर्निचर बाहेर आणून आग लावली. हंगामा सुरू झाला. रेक्टरने पोलिसांना पाचारण केले. दंगलीसाठी खास शिक्षण दिलेल्या एस. आर. पी. ची कुमक आली आणि त्यांनी खोलीत जाऊन गाठून विद्यार्थ्यांना बडविले. थोडे अपराधी आणि जोडीला बरेचसे निरपराधी लाठीखाली भरडले गेले. ही घटना घडली ३ जानेवारीला. पोलिसी दमनशाहीची गावात बातमी पसरली आणि लोकमत खवळून उठले. प्रत्येक कॉलेजमधील विद्यार्थी संघटना एकत्र आल्या. 'युवक समितीची' स्थापना

झाली. पोलिसी अत्याचारांचा निषेध करायचा ठरला. कॉलेजमध्ये सभा झाल्या. भाषणे झाली. गुजराथच्या इतर भागातही भाववाढीविरुद्ध आवाज उठत होता. सरकार पोलिसांकरवी तो आवाज दडपण्याचा प्रयत्न करीत होते. या सर्व बातम्यांमुळे असंतोष वाढत होता. या सरकारविरुद्ध व्यवस्थित आंदोलन सुरू करावे असा सूर निघत होता. नेतृत्व कोण करणार? कोणा नेत्याला बोलवावे? मार्गदर्शन मिळवावे? ७ जानेवारीला मागच्या वर्षीच गाजलेल्या पोटनिवडणुकीमध्ये लोकसभेसाठी निवडून आलेले अपक्ष खासदार श्री. पु. ग. मावळंकर मद्रासहून अहमदाबादला परत आले. मावळंकर कोणत्याही पक्षाच्या अध्यात ना मध्यात, स्वच्छ चारित्र्याचे, शुद्ध लोकशाही तंत्रावर विश्वास ठेवणारे. तेव्हा युवकांचा एक गट त्यांच्याकडे आला सल्लामसलतीसाठी–

ही झाली घटनांची साखळी. पण यातूनही मला विद्यार्थी एकदम इतका लढाऊ कसा झाला, पटकन संघटित कसा झाला, याचे समाधानकारक उत्तर मिळेना. मी आणखीन खोलात शिरले. कॉलेजच्या 'विद्यार्थी संघटना' होत्या म्हणजे काय? त्यांचे स्वरूप काय? उत्तर मिळाले त्यांचे नाव स्टूडन्टस वेल्फेअर कमिटी. सांस्कृतिक कार्यक्रम करणे वगैरे जबाबदारी त्यांची. बरं पुढे! यंदापासून विद्यापीठाच्या सिनेटमध्ये विद्यार्थ्यांना प्रतिनिधित्व मिळाले. ऑगस्टमध्येच निवडणुका झाल्या आणि त्या खूप गाजल्या. पण सिनेटमध्ये प्रतिनिधित्व मिळाले तरी सिनेटची सभा बोलविण्याचा अधिकार उपकुलगुरूंना आणि आतापर्यंत फक्त एकच सभा बोलाविली होती. विद्यार्थी घुश्श्यात होते. बरं सिनेटचे मेंबर किती? २५०. विद्यार्थी प्रतिनिधी फक्त १२.

हळूहळू माझ्या डोक्यात प्रकाश पडायला लागला. या सिनेटच्या निवडणुकांच्या निमित्ताने उमेदवार कॉलेज कॉलेजमधून भटकले असणार. पहिलीच निवडणूक, भांडून भांडून हक्क मिळविले. हक्कांबद्दल जाणीव जागृत झाली. तेव्हा हे जे लोकशाहीचे बाळकडू मिळालं त्यामुळे विद्यार्थी अधिक जाणतेपणाने राजकारणाला सामोरे जाऊ लागले. ◻

## ३० जानेवारी सकाळी ११ वाजून ५ मिनिटं

अक्षरशः भराभरा माहिती घेणं चाललं होतं. घरातून बाहेर पडून सगळ्या लोकांना भेटण्याआधी थोडीफार माहिती असणं आवश्यक होतं. सतीश आणि आनंदची त्यासाठी फार मदत झाली. सिनेटची घटना कशी असते त्याचाही थोडाफार परिचय करून घेतला. कारण या सिनेटमध्ये सत्तेची मुळे रुजविण्याचा प्रयत्न दिसत होता. आणि या मुळांना उखडून काढणाऱ्या

शक्तीही तेथेच असाव्यात.

लोकसभेचे खासदार पु. ग. मावळंकर शेजारीच रहात होते. त्यांची मुलाखत मागितली होती. बोलावणं आलं. उन्हं चांगलीच वर चढली होती. थंडी मस्त होती. अजूनही अंगावर शाल घ्याविशी वाटत होती. दिवस संथ होता. आज कर्फ्यू फक्त १२ ते ५ उठणार होती. कोणालाच बाहेर जायची घाई नव्हती. बायका मात्र अस्वस्थ होत्या. दोन दिवस भाजी मिळाली नव्हती. साखर संपली होती. बाजरी आणायची होती. रॉकेल-साठी रांगा होत्याच, तेवढ्या वेळात सगळं उरकून घ्यायचं. मी स्वतःला पत्रकार म्हणत त्रयस्थपणे सर्व निरखीत होते.

श्री. पु. ग. मावळंकर – गांधीवादी परंपरेत वाढलेली अत्यंत ऋजु मनाची व्यक्ती. १६ वर्षे प्राध्यापक, प्राचार्य वगैरे शिक्षकाचा पेशा. लास्की इन्स्टि-ट्यूटचे संचालक. चारीबाजूंनी पुस्तकांचा गराडा. त्यांना फार आनंद झालाय् – विद्यार्थी लोकशाहीच्या रक्षणासाठी उठ-लाय्, सगळीकडे अंधार आहे. स्वार्थाचा सुळसुळाट, आणि या मदमत्त सत्ताधि-काऱ्यांवर अंकुश कोणाचा ?

त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितलं, मी तुमचा मित्र होईन, सल्लागार होईन, मार्गदर्शक होईन पण अध्यक्ष होणार नाही. तुमच्या एकीबद्दल मी तुमचे अभिनंदन करतो. तुम्हाला अभिवादन करतो – तुम्ही पुढाकार घेतलात. आता नागरिकांचे सहाय्य घ्या. आणि अहिंसक मार्गाने लढा पुढे जाऊ दे. तुमच्या मागण्या पॉझिटीव्ह असू द्यात. 'चिमण-भाई सरकार गेलेच पाहिजे' या मागणीवर तुम्ही दृढ रहा.

९ जानेवारीला सभा झाली. विद्या-र्थ्यांची भाषणे झाली. मावळंकर ऐकत होते. विद्यार्थ्यांचा आवेश, उसळते रक्त, लढाऊ पवित्रा– त्यांना कौतुक वाटत होतं. पण काही सूर अवास्तव होते. अनार्किस्ट (अनागोंदी) होते. 'आम्ही पॅरलल गव्हर्नमेंट चालवू' अशी मस्तीची भाषा काही बोलले. मावळंकर किंचित व्यथित झाले. १० जानेवारीच्या अहमदाबाद बंदचा निर्णय घेण्यात आला. विद्यार्थ्यांच्या एकजटीचा विजय होता. मिरवणूक काढण्याची कल्पना मात्र मावळणकरांनी मोडून काढली. आपलाच बंद आपणच तोडायचा नाही.

बंद यशस्वी झाला. मात्र दुपारी दोन वाजेपासून सरकारने कर्फ्यू घातली ती १५ ता. पर्यंत चालूच होती. मध्ये काही तास उघडीक असे तेवढीच.

या काळात पुन्हा १३-१५ तारखांना विद्यार्थ्यांबरोबर भेटी झाल्या. पण लक्षात आलं, विद्यार्थ्यांना शांततामय आंदोलनाचा मार्ग पसंत नाही. मावळं-करांचे नाव ते वापरू बघताहेत. पण शेवटी आपल्या मनानेच करतात. त्यांनी घेतलेले कार्यक्रम अधिक जहाल वाटले. मावळंकरांनी आग्रह धरला शाळा, कॉलेजेस उघडू द्यात. रोजचे व्यवहार सुरू होऊं द्यात. विद्यार्थी हटून बसले, चिमणभाई गेल्याखेरीज आम्ही शाळा कॉलेजमध्ये जाणार नाही.

मावळंकरांनी प्रेसमध्ये स्टेटमेंट दिले–

' सिटिझन्स डेमोक्रॅटिक ॲक्शन कमिटी ' स्थापन केली पाहिजे. आणि अपक्ष भूमिकेवरून नागरिकांनी यासाठी एकत्र यावे. चिमणभाई सरकार गेले पाहिजे. राष्ट्रपती राजवट तात्पुरती यावी. विधानसभेसाठी नव्या निवडणुका घेतल्या जाव्यात आणि स्वच्छ लोकशाहीची स्थापना व्हावी. असे त्यांनी आवाहन केले होते. सध्यातरी विद्यार्थी त्यांच्यापासून दूर गेले होते.

' पण आम्ही तर वृत्तपत्रांत वाचले ' नवनिर्माण युवक समिती ' नाव तुम्ही सुचविलेत. ' मला नावाबद्दल उत्सुकता होती.

' हो, त्या नावाची गंमतच झाली. जयप्रकाश नारायणनी नुकतेच भाषण केले होते विद्यार्थ्यांना उद्देशून. ' सध्याचे शिक्षण तकलादू आहे. विद्यार्थ्यांनो शिक्षणसंस्था सोडून द्या. समाजाभिमुख व्हा. समाजाकडून शिका. ' असा त्यांचा संदेश होता. गांधी पीस फाऊंडेशन तर्फे आम्ही त्या भाषणाचे भाषांतर करून पत्रके काढली होती. ९ जाने. च्या माझ्या विद्यार्थ्यांबरोबरच्या पहिल्या मीटींगमध्ये मी त्यांना सुचविले, जयप्रकाश म्हणतात, विद्यार्थ्यांमध्ये नवनिर्माणाची शक्ती आहे. आपण भ्रष्टाचारी सरकार घालवून नवीन आणणार आहोत तेव्हा आपण स्वतःला नवनिर्माण युवक समिती म्हणवू आणि तेच नाव विद्यार्थ्यांनी उचलून धरले. '

तेव्हा अशा रीतीने ५ जानेवारीला स्थापन झालेल्या युवक लागणी समितीचे (युवक भावना समिती) ९ जाने. ला नवनिर्माण युवक समिती या महत्त्वाकांक्षी संघटनेमध्ये रूपांतर झाले.

' सरकारने विधानसभा बरखास्त केली पाहिजे, लोक प्रतिनिधींनी लोकांचा विश्वास गमावला आहे आता पुन्हा नव्याने कौल मागितला पाहिजे ' या मागणीसाठी मावळंकर, रविशंकर महाराजांचा हवाला देत होते. हे गुजराथचे विनोबाजी भावे. आपल्याकडे जसे सर्व उद्योगपती, राजकारणपटु विनोबाजींच्या पाया माथा ठेवतात, सल्ला विचारतात आणि अनुकूल असला तर त्याचे भांडवल करतात. गुजराथच्या जनतेला रविशंकर महाराजांचा तसा आधार वाटतो. सर्वोदयी पुढारी, खेडोपाडी फिरून लोकांमध्ये काम केलेले. चिमणभाई अधिकारावर आले तेव्हा महाराजांचे आशिर्वाद मागायला आले होते. आता मात्र महाराजांनी आपले मत दिल्यावर चिमणभाई महाराजांचे नावसुद्धा काढीनासे झाले याबद्दल आश्चर्य वाटायला नको.

मावळकरांशी बोलताना पुन्हा एकदा लक्षात येत होते. गुजराथ विद्यापीठाचे आणि आजच्या शक्तीस्थानाचे – राज्यसरकारचे दाट संबंध. उमाशंकर जोशी– पूर्वीचे उपकुलगुरू, आता चिमणभाईंचे खास शत्रू. दोघे एकमेकांना पाण्यात पाहतात. त्यांचाही या विद्यार्थ्यांना पाठिंबा आहे.

विद्यार्थ्यांनी कितीही नाही म्हटलं, आणि खरीखुरी भ्रष्टाचाराविरुद्ध चीड येऊनच तो पेटून उठलाय असे खरे मानले तरी त्याच्या शक्तीचा फायदा

घेऊन आपापला स्वार्थ साधायला समाजातले अनेक गट पुढे आले होते. प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे विद्यार्थी शक्तीला मदत करून घट्ट चिकटून बसलेल्या चिमणभाई सरकारचे आसन खिळखिळे करणे हा त्यांचा मुख्य उद्देश. गुजराथचे राजकारण हे असे अनेक पदरी गोफासारखं आहे. ' विद्यार्थी आंदोलन स्वयंभू आहे, जनतेचे आंदोलन स्वयंभू आहे हा जनतेचा उठाव आहे ' असे वारंवार कानावर पडत होते. आणि तरीही या सगळ्या महापुराखाली असलेले वेगवेगळे अंत:प्रवाह पहायला मन उत्सुक होतं. मावळंकरांसारख्या निरागस माणसाला वाटत होतं— या महापुरासरशी सर्व घाण धुवून जाईल. आणि शेवटी निखळ, निर्मळ लोकशाहीचे पाणी उरेल. सच्चे लोक, शुद्ध चारित्र्याचे लोक निवडणुकीतून निवडून येतील. जनतेचा विजय होईल. त्यांनी त्यांच्या निवडणुकीच्या वेळची आठवण सांगितली. त्यांच्याविरूद्ध सत्ताधारी काँग्रेसचा उमेदवार होता. इंदिरा लाटेने सगळीकडे काँग्रेस पक्ष सत्तारूढ झाला होता. अशा माणसाशी त्यांनी लढत द्यायचे ठरविले. सर्व विरोधी पक्षांनी पाठिंबा जाहीर केला. लोकांनी उत्स्फूर्त मदत केली. ते निवडून आले तेव्हा लोकांनी आनंदाने मिरवणूक काढली, घोषणा होती,

जीत गया भाई जीत गया,
सच्चाईवाला जीत गया।

मावळकरांचा विश्वास होता, जनता डोळस आहे. नव्या निवडणुकीत गुजरायची जनता भल्या माणसांनाच मते देईल.

मला मात्र वाटत होते, समुद्रमंथनातून चौदा रत्नं वर आली, पण त्यात सगळीच चांगली नव्हती. हलाहलही त्यातच होते. ¤

---

## ३० जानेवारी दुपारी १ वाजता

---

पोटपूजा करून मी बाहेर पडले. आणि सकाळी मृतवत वाटणारे हेच शहर गजबजून गेलेले आढळले. रक्त गोठून शरीर काष्ठवत व्हावे आणि पुन्हा एकदा रक्ताची लाट शरीरभर सळसळत जावी तसं काहीसं. मुंबईच्या कोणत्याही रस्त्यावर दिसणारी दृश्ये, रॉकेलसाठी लांब लांबच रांगा, स्वस्त धान्याच्या दुकानासमोर दिसणाऱ्या रांगा येथेही होत्याच. शिवाय दुधासाठी रांगा आणि भांडणे. बरेचसे बूथ जळालेले. कर्फ्यूमुळे एकवेळ येणारे दूध. लोकांमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता. मला वाटतं वातावरणातच एकप्रकारची अरेरावी येते. प्रत्येकाला आपल्या मनगटातील शक्ती तपासून पहावीशी वाटते.

सर्वात प्रथम फोटोग्राफरकडे जायला हवे होते. दोन दिवसात आतापर्यंत घडलेल्या सर्व घटनांची क्षणचित्रे गोळा

करायची होती. (माणूस चित्रवार्ता पुरवणीची तयारी.) गुजराथी वर्तमानपत्रे रोज पाने भरभरून फोटो प्रसिद्ध करीत होते. मी गेले त्या दिवशी लष्कराचे लोकांनी केलेले प्रचंड स्वागत वृत्तपत्रांनी मोठ्या ठसठशीतपणे दाखविले होते. जनसत्तेचे फोटो सर्वात छान होते. 'लष्कराचे लोकांनी केलेले स्वागत' याचा अर्थ काय लावायचा? सकाळपासून माझ्या डोक्यात हे घोळत होते. यानंतरच्या मुलाखतीमध्ये जरूर यासंबंधी विचारायचे मी ठरविले.

आणखी एक गंमत माझ्या लक्षात येत होती. अहमदाबाद ही एका राज्याची राजधानी. येथील वातावरण सर्व टाऊनिश होतं म्हणजे सबंध गावाला एकसंधपणाची जाणीव होती. सर्व गावात, लोकांच्या तोंडावर एकच विषय – रोटी रमखाण – वर्तमानपत्राचे रकानेच्या रकाने भरलेले – जनतेचा उत्स्फूर्त उठाव – मोर्चे – मिरवणुकी – जाळपोळ, दगडफेक–गोळीबार पाच ठार. जणू गुजराथ म्हणजेच सर्व जग. बाकीच्या जगात काय चाललंय् याचा पत्ता नाही. वृत्तपत्रातल्या कोणत्या तरी कोपऱ्यात छोटीशी बातमी. कोणीही या आंदोलनाला पाठिंबा देणारं स्टेटमेंट काढावं, आपली अभिनव कल्पना पुढे मांडावी. आणि वृत्तपत्रांनी छापून आणावं. रोज नवीन हीरो पुढं येत होते. फोटोग्राफर्स मुळी शोधातच फिरत होते. कोणाच्याही घरी जा. चहाच्या घोटाबरोबर तो विषय. मी पत्रकार म्हटल्यावर तर परिस्थितीबद्दलचं आपलं मूल्यमापन द्यायला प्रत्येकजण अहमिकेने पुढे येत होता. जनतेच्या सर्व वर्गांची एकजूट अभेद्य होती.

मी मुंबईशी तुलना करून पहात होते. मुंबई महानगर. राष्ट्रीय पातळीचे, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे. अनेक भाषा, विविध लोक. मुंबईला परवा बी. डी. डी. चाळीमध्ये खूप मोठा अत्याचार झाला. वृत्तपत्रात दोन रकाने माहिती आली. बस्स तेवढेच. मराठी जनसमुदाय थोडा हादरला. मराठीतर लोकांनी भुंवया उंचावून काय प्रकार आहे बुवा अशी उत्सुकता दाखविली. पण नित्य व्यवहार व्यवस्थित सुरू होते. संध्याकाळी राज्य नाट्य स्पर्धा चालू होत्या. संक्रांतीचे हळदीकुंकू, ताजमध्ये कोणाचीतरी पार्टी, उपनगरामध्ये स्वस्थ, शांत झोपलेले शहर. महाकाय राक्षसाच्या अंगावर माशी बसावी, त्यानं नेमकी चिमटीत धरून फेकून द्यावी. फारच त्रास दिला तर अंगाच्या त्या भागावर दोन चापट्या माराव्या. तेवढाच त्याच्या गाढ झोपेमध्ये व्यत्यय. बाकी घोरण्याची संथ लय सुरू. तसं या मुंबईचं. ती अंतर्बाह्य गुंतून जात नाही. अहमदाबादला सध्या तर १४४ कलम जारी आहे. जरा कोणी १०० लोकांना एकत्र जमवून सभा घ्यायचा प्रयत्न केला तरी त्याचा फोटो निघतो. मुंबईला हजाराचा मोर्चा काढला तरी कोपऱ्यात बातमी छापून येते. नशिबवान आहेत बुवा अहमदाबादचे लोक, विद्यार्थी, विद्यार्थीनेते.

फोटोग्राफर भेटला नाही. त्याने

दुकान दुसरीकडे हलविल्याचे कळले. वरीचशी दुकाने बंद होती. एच. के. आर्टस् कॉलेज पहिल्यापासूनच झुंजार कॉलेज. त्याच्या प्राचार्यांना भेटायचे ठरविले. यशवंत शुक्ल. प्रथमपासून विद्यार्थ्यांच्या मागण्यांना बिनाशर्त पाठिंबा एववंच नव्हे तर कॉलेजच्या विद्यार्थि विद्यार्थीनींचा मौन मोर्चा काढून एल. डी. इंजिनिअरींग कॉलेजमधील पोलिसी अत्याचारांच्या निषेधात भाग. त्या मोर्चावर लाठीमार म्हणून दुसऱ्या दिवशी कॉलेजच्या आवारात विद्यार्थ्यांसकट २४ तासांचे उपोषण करण्यात पुढाकार. तर असे हे प्राचार्य, आपली प्रतिष्ठेची खुर्ची सोडून विद्यार्थ्यांच्यात मिसळणारे, त्यांच्या प्रश्नांशी एकजीव होणारे, म्हटलं भेटलंच पाहिजे. घरी गेलो. घरी नाहीत. कधी येतील? बहुधा इतक्यात नाही. सरकारची ऋद्ध नजर वळलेले जे काही महाभाग त्यांच्यापैकी ते एक. त्यामुळे सध्या वास्तव्य बदललेले. म्हणजे आंदोलनाचे सूत्रधार भेटायचे चान्सेस एकूण कमीच दिसत होते.

### के. शिवराम....

मग पत्रकाराला गा ायचे ठरविले. म्हटलं चौफेर हिंडणारा, सहस्राक्षी असण्याची पात्रता असणारा, बारीक सारीक धागे टिपणारा, जोडून सहज चित्र देणारा तोच. टाईम्स ऑफ इंडियाच्या ऑफिसात विक्रम रावची चौकशी केली. जॉर्ज फर्नांडिसची ओळख. मोशाय बडोद्याला बदलून गेलेले. दुसरा पत्ता इंडियन एक्स्प्रेसचे अहमदाबादचे संपादक के. शिवराम. शिवरामसाहेब भेटले. पत्र वगैरे दाखविल्यावर खूश होतसाते फॅन्टा मागवून त्यांनी स्वागत केले. आता माझे प्रश्न तयार होते. काही साखळी लागत नव्हती, दुवे जोडले जात नव्हते. ते शोधायचे होते.

"तुम्हाला काय वाटतं, आंदोलन कशासाठी आहे? भाववाढीमुळे लोक त्रस्त झाले, स्वस्त धान्याच्या दुकानातून धान्य मिळाले नाही म्हणून या 'अन्न-दंगली' आहेत? की भ्रष्टाचाराबद्दल खरोखरच लोकमत इतकं तीव्र झालंय की भाववाढीचे निमित्त करून हे सरकार खाली खेचण्यासाठी काही शक्तींचा हा प्रयत्न आहे? हा 'राजकीय खेळ आहे?"

"जनतेचा क्षोभ स्वयंभू आहे. आणि तो धान्याच्या टंचाईमुळे निर्माण झालाय हे खरंय. गेल्या महिन्यात स्वस्त धान्य दुकानात धान्यच आले नाही. दुकानांची लुटालूट—विशेषत: धान्य दुकानांची, हा त्याचा पुरावा आहे. व्यापाऱ्यांविरुद्ध लोकमत तयार झालंय, सरकारविरुद्ध तर भयानक असंतोष आहे. अर्थात दुकाने लुटण्यात गुंडांचाही हातभार आहेच. पण माझ्या मते या आंदोलनाला जे टोक प्राप्त झालंय त्याचे श्रेय विद्यार्थ्यांनाच द्यावं लागेल. त्यांनी मागण्या क्रिस्टलाइडज् करून समोर मांडल्या. लोकांच्या भावनांना विशिष्ट दिशा दिली. भ्रष्टाचार आतापर्यंत होताच. पण तो आता सर्वव्यापी झालाय. चिमणभाई भ्रष्टाचारी आहे हे

माहीत होतेच. पण तो कार्यक्षम असेल असं वाटलं होतं. पण त्याच्या भ्रष्टाचाराची कीड इतकी खोलवर पोचलीय की कार्यक्षमता संपली. परिणाम, भाववाढ, अन्नाची टंचाई. स्वतःची खुर्ची ठेवण्याच्या नादात त्याचे जनतेकडे दुर्लक्ष झालंय. तेव्हा सरकारने जनतेचा विश्वास गमावलाय- चिमणभाई सरकार मस्ट गो. गेलेच पाहिजे "

"समजा सध्याची अन्नटंचाई सरकारने दूर केली, तुम्ही फोटो पाहिलेच असतील. कडक लष्करी बंदोबस्तात धान्याची पोती घेऊन ट्रक्स आणले जाताहेत, तर लोकांचा राग शांत होईल का ? चिमणभाई सरकार गेलेच पाहिजे हे मागणीचे टोक बोथट होईल का ?"

"मला तसं वाटत नाही. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यातच सरकार खडबडून जागं झालं असतं आणि धान्याची सोय केली असती तर कदाचित ही आग विझू शकली असती. पण सरकारला परिस्थितीच्या स्फोटकतेची कल्पनाच आली नाही बहुधा. चेतावणी देणारी ठिणगी कोण आहे ? विद्यार्थी. त्यांच्याशी बोलणी सुरू केली. हॉस्टेस्लना स्पेशल धान्य कोटा काय मंजूर केला.चेम्बर ऑफ कॉमर्सने प्रत्येक विद्यार्थ्यासाठी १० रु. अन्नखर्च सोसायची तयारी दाखविली. उपकुलगुरूंबद्दल असंतोष होता. त्यांना बदलण्याची तयारी दाखविली. पण व्यर्थ. विद्यार्थ्यांचे खरोखरच कौतुक करण्याजोगे आहे. त्यांची एकजूट अभंग राहिली. जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात तर प्राध्यापक मंडळीही त्यांना सामील झाली. गुजराथ युनिव्हर्सिटी एरिया टीचर्स असोसिएशन (GUATA) फार लढाऊ संघटना आहे. सध्या या प्राध्यापकांपैकी दोघांना M. I. S. A. खाली पकडलं आहे. काहींच्यावर वॉरंट आहे."

"थोडक्यात म्हणजे सध्याच्या आंदोलनाला मला रॉकेटची उपमा द्यावीशी वाटते. जन आंदोलनांचे स्फोट होताहेत. त्या स्फोटातून शक्ती मिळून विद्यार्थी आंदोलनाचे रॉकेट उंच उंच जातंय, लक्ष्य आहे चिमणभाई सरकार. पुन्हा एकदा स्फोट, आंदोलन तीव्र, रॉकेट पुन्हा उंच फेकलं जातंय. आणि कुठे मिसफायरींग झालं नाही तर हे रॉकेट आपलं इच्छित ठिकाण गाठीलही."–मी.

"राइट यू आर. प्रश्न एवढाच आहे. या आंदोलनाचे सातत्य कसं काय टिकतंय."–शिवराम

"मला तर याला कुठेच ऑर्गनाइज्ड संघटित स्वरूप दिसत नाही आहे. मला प्रथमपासून प्रश्न पडलाय, जनता आणि विद्यार्थी यांचा मैत्री करार खरोखरच झाला का ? दोन्ही शक्तींची सांगड घातली गेली का ? की विद्यार्थी नेते अलग राहिले, आपले उत्स्फूर्त कार्यक्रम करत राहिले ? जनता उत्स्फूर्तपणे आपल्यापरीने आगीत तेल ओतीत राहिली ? विद्यार्थ्यांना मार्गदर्शन कोणी केले ? सकाळपासून मी पुन्हा पुन्हा ऐकतेय विद्यार्थ्यांनी कोणाही राजकीय पक्षाला जवळ येऊ दिले नाही."

" तुमचं निरीक्षण पुष्कळसं बरोबर आहे. खूप मोठ्या प्रमाणावर संघटित स्वरूप आंदोलनाला अजून तरी नाही. पण विद्यार्थी आंदोलनाच्या सुरुवातीपासून ' १४ ऑगस्ट समितीचे ' सहाय्य आणि मार्गदर्शन विद्यार्थी जरूर घेताहेत. या १४ ऑगस्ट कमिटीलाच श्रमजीवी संघ म्हणतात. "

' अच्छा, म्हणजे मला जी बातमी मिळाली ती तितकीशी बरोबर नाही तर. '

" तुमची बातमी थोडीशी खरी आहे. विद्यार्थ्यांनी १४ ऑगस्ट समितीशी हातमिळवणी केली नसून, १४ ऑगस्ट कमिटी 'च्या लोकांनी आपला संपूर्ण पाठिंबा आंदोलनाला जाहीर केला आहे. विद्यार्थ्यांनी ' १४ ऑगस्ट कमिटी 'च्या नेत्यांना कधीही आपल्या व्यासपीठावर बोलायला बोलाविले नाही. "

**' अच्छा हे काय प्रकरण आहे ? '**

' १९७० साली १४ ऑगस्टला रात्री या कमिटीची स्थापना झाली. सगळ्या ट्रेड युनियनस् (बहुतेक डाव्या–मजूर महाजन यात सामील नाही) एकत्र एकत्र आल्या. आणि त्यांनी वर्कर्स चार्टर ऑफ डिमांडस् (कामगारांच्या मागण्यांचा जाहीरनामा) तयार केला. गांधीनगरला त्यावर्षी मध्यरात्रीचे विधानसभेचे अधिवेशन होते. आम्ही ६८युनियन्सच्या सभासदांचा प्रचंड मोर्चा मध्यरात्री गांधीनगरला घेऊन गेलो. एक सहस्र स्त्रिया, (त्यापैकी ४०० नर्सेस) त्यात सामील होत्या. फारच उत्साहवर्धक अनुभव होता तो. आम्ही गुजरात जर्नेलिस्ट युनियनही बनविली होती. आम्हीही मोर्चात होतो. गुजराथ राज्य कर्मचारी महामंडळ, ए. एम्. टी. बसेसच्या ड्रायव्हर्स–कंडक्टर्सची युनियन, रिक्षा–टॅक्सीवाल्यांची युनियन. अशा बऱ्याच स्ट्रॅटेजिक महत्त्वाच्या युनियन्स त्यावेळी एकत्र आल्या. आज जवळजवळ ७५ युनियन्स आणि २·२५ लाख कामगार या १४ ऑगस्ट समितीच्या कक्षेत आहेत. मात्र त्यामानाने या संघटनेचे काम चालू नाही. तशी या संघटनेला घटनाही नव्हतीच. एक मात्र निर्णय होता–सगळ्यांनी एक मुखाने निर्णय घेतला तरच एखाद्या राजकीय कार्यक्रमामध्ये संघटना भाग घेईल. आणि यंदा तशी वेळ आली. १० जानेवारीला बंद आणि २५ जाने. बंद हे दोन्ही निर्णय या ' श्रमजीवी संघा 'ने घेतले. विद्यार्थ्यांच्या बरोबर सल्ला मसलत करून घेतले. १० जानेवारीला फक्त अहमदाबाद बंद होते. दि. २५ ला गुजराथ राज्य बंद करून जनतेच्या एकजुटीचा आणि तीव्र संतापाचा प्रत्यय आम्ही सरकारला आणून दिला. अर्थात एक गोष्ट नक्की, श्रमजीवी संघाचे प्रत्यक्ष जनतेत खूप काम आहे म्हणून बंद यशस्वी झाला असे मात्र नव्हे. श्रेय श्रमजीवी संघाला थोडेसे. बंद यशस्वी झाला कारण जनतेमध्ये तीव्र असंतोपाची लाट उसळली आहे. त्यामुळे कोणाचेही नेतृत्व मानून जनता आपले आंदोलन चालू ठेवते आहे. नव निर्माण युवक समितीच्या लोकप्रियतेचाही यामध्ये फार महत्त्वाचा वाटा आहे.

'अच्छा म्हणजे विद्यार्थी–कामगार मैत्री करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न झाला होता तर.'

'पण त्या प्रयत्नाला काही विशेष फळ यायच्या आतच कामगार नेत्यांना पकडले गेले. दिनकर मेहता मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते, सुबोध मेहता–भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते, सोशॅलिस्ट पक्षाचे काही कार्यकर्ते आणि विद्यार्थी नेते मनीषी जानी, प्रकाश रावळ वगैरे ४३ लोक आज M. I. S. A. खाली अटकेत आहेत. साबरमती नदीच्या वाळवंटात त्यांनी २५ जानेवारीच्या बंद साठी, जनतेची मानसिक तयारी करण्यासाठी दोन मोठ्या सभा भरवल्या आणि २५ तारखेच्या आतच त्यांना अटक झाली.'

'हा M. I. S. A. फक्त इमर्जन्सी मध्येच वापरता येतो नं!'

'तीच तर गंमत आहे. मागच्या वर्षी दुष्काळ पडला म्हणून सरकारने इमर्जन्सी जाहीर केलेली होतीच. अजूनही ती चालू आहे. गुजराय सीमेवरचं राज्य पडतं ना! आणि M. I. S. A. म्हणजे अंतर्गत सुरक्षा कायदा. हा दुष्काळामध्ये जे लोक साठेबाजी करतात, काळा व्यापार करतात त्यांना पकडण्यासाठी आम्ही वापरणार आहोत असे सरकारने इमर्जन्सीचे समर्थन केले होते. आज मात्र हा कायदा केवळ विरोधी पक्षाच्या लोकांची, विरोधी आवाजाची मुस्कटदाबी करण्यासाठी वापरला जात आहे. ही लोकशाहीची बदनामी आहे. ही हुकुमशाहीची लक्षणे आहेत. नक्षलवाद्यांना तुम्ही याच कायद्याखाली पकडणार, सनदशीर मार्गाने आपला असंतोष व्यक्त करू पाहाणाऱ्यांना त्याच कायद्याखाली पकडणार. आणि अजून सबंध गुजराय राज्यात एकही संग्रहखोर व्यापारी, लेव्ही न देणारा शेतकरी या कायद्यात अडकत नाही. म्हणजे काय? सुरक्षा कायद्याचा मुख्य तोटा म्हणजे जामीनाची परवानगी नाही. त्यामुळे खटला न भरताही वर्ष वर्ष तुरुंगामध्ये अडकवून ठेवता येते....'

'गोळीबार, लाठीमार वगैरे शारीरिक अत्याचारापेक्षाही हे फार भयंकर आहे. एखादे आंदोलन, चळवळ उभी राहाता राहाताच खुडून टाकण्याचे हे फार प्रभावी साधन झाले. नेते तुरुंगात. मग दिशाहीन समाज अधिकच अस्ताव्यस्त बनतो. हिंसेला हिंसेचे प्रत्युत्तर मिळते. आणि सरकारला पोलिसी दमनयंत्रणा वापरावयाचे आणखी निमित्त.' मी शहारते.

## विरोधी पक्षांची स्थिती

'तेच तर गुजरायमध्ये चालू आहे सध्या. एकही काँग्रेस आमदाराला घराबाहेर येऊन जनतेला भेटण्याचे धैर्य नाही. परिस्थितीची कारणे समजावून सांगण्याचे धैर्य नाही. जनतेचे प्रतिनिधी म्हणवतात स्वतःला. मग जनतेला विश्वासात घ्या. मागच्या वर्षी दुष्काळ होता. निसर्गाचा कोप म्हणून जनता गप्प बसली. यंदा बंपर पीक आलंय्. वर्तमानपत्रातून वृत्त प्रसिद्ध होतंय्. ते पीक कुठे गेले? ही आळीमिळी गुपचिळी का? टंचाईचे उत्तर काय, तर

केंद्राने कबूल केल्याप्रमाणे धान्य पुरविले नाही. आपल्या अंगावरची जबाबदारी टाळून मोकळे.'

'या आंदोलनाचा विरोधी पक्षांना फायदा काय ? आज एक तरी विरोधी पक्ष गुजराथमध्ये पर्यायी सरकार बनविण्याची शक्यता आहे का ? डावे पक्ष तर फारच दुबळे आहेत. या डाव्या पक्षाच्या पुढऱ्यांनी आता चेतावणी देऊन काय साधलं ? निदान लोकांचे काही शिक्षण तरी झाले का ?'

फायदा आता प्रत्यक्ष काही नाही. या विधानसभेत एकूण १६८ जागांपैकी १४० सत्तारूढ काँग्रेसच्या आणि २८ फक्त विरोधी पक्षाकडे आहेत. त्यातही काँग्रेस (०) जास्त, जनसंघाकडे ३ जागा फक्त, अशी स्थिती आहे. पण जर विधानसभा बरखास्त झाली आणि नवीन निवडणूका झाल्या तर लोकमत इतकं काँग्रेसच्या विरुद्ध गेले आहे की त्याचा फायदा काँग्रेस (०) आणि जनसंघ यासारख्या थोडीशी संघटना असणाऱ्या पक्षांना नक्कीच मिळेल. त्यांच्या जागा वाढतील.

'डाव्या पक्षांच्या दृष्टीने फायदा इतकाच की जनतेच्या चळवळी वाढून जनता अधिक दक्ष राहील. लोकशाही जाणीवा अधिक जागृत होतील. सध्या निवडून दिले की ५ वर्षे झोपा आणि अगतिकपणे पहात बसा असा जो खाक्या आहे त्याला तडा जाईल. लोकशाही स्वच्छ राहायला हवी असेल तर जनतेने सतत दडपण आणले पाहिजे, पहारा केला पाहिजे, इतकं जरी जनतेला कळलं तरी पुष्कळ झालं. सध्याच्या लोकशाहीचे स्वरूप उघडकीला आलं, सरकार कोणत्या वर्गाचे पाठिराखे आहे हे सत्य उघडंनागडं त्यांना पाहायला मिळालं. हेही तसे थोडके.

'तोटा एवढाच की हे सगळं पूर्णपणे जनतेच्या गळी उतरावयाला वेळ मिळाला नाही. आणि जनतेची आठवण फार कमी दिवस टिकते.'

माझे लक्ष सतत घड्याळाकडे होते. कर्फ्यू फक्त १२ ते ५ उठणार होती. त्याच्या आत बरंच काम आटपायचं होतं. गुजराथ सरकारच्या गृहखात्यातील एक डेप्युटी सेक्रेटरी ओळखीचा होता. आय्. ए. एस्. ऑफिसर. परिस्थिती तंग असल्यामुळे त्या लोकांनी ऑफीस गांधीनगरहून अहमदाबादला आणले होते सर्किट हाऊसमध्ये. त्याच्यातर्फे पास मिळणार होता. प्रश्न होता वाहन मिळण्याचा. कर्फ्यू सुरू झाली की सगळं चिडीचाप. सर्किट हाऊसलाच के. सी. पंतांची प्रेस कॉन्फरन्स होती. के. सी. पंत महाशय दोन दिवसापूर्वीच गुजराथ प्रश्नाची पाहणी करण्यासाठी दिल्लीहून खास आले होते. आपली गाऱ्हाणी त्यांच्या कानावर घालण्यासाठी बरेच लोक त्यांना भेटले होते. काँग्रेसमधील अनेक गट, मंत्रीमंडळातील अनेक गट. पंतसाहेब स्वतः केंद्रामध्ये पाटबंधारे मंत्री आणि बिर्लांचे खास दोस्त. ते काही छोट्या मोठ्या भ्रष्टाचाराच्या कहाण्यांनी हादरून जाणारे नव्हते. भ्रष्टाचार हे राजकारणाचे अंगच. प्रश्न आहे छपविण्याचा आणि जनतेसमोर

भांडणं उजेडात न आणण्याचा.

श्री. शिवराम यांनी अहमदाबादच्या राजकीय प्रवाहासंबंधी बरीच माहिती पुरविली होती. अर्थात तीही एका बाजूचीच होती. उद्या जनसंघ नेत्यांना भेटायचं होतं. सत्तारूढ कांग्रेसमधील फुटून निघालेल्या २५ जणांपैकी कोणी-तरी गाठायचं होतं.

शिवरामचे आभार मानले. त्यांनी आणखीही एक माहिती पुरविली. 'भूमीगत झालेल्या विद्यार्थी नेत्यांपैकी एकजण सध्या माझ्या शेजारी रहातोय्. आलात त्या बाजूला तर गाठ घालून देईन. अर्थात तोपर्यंत तो तेथे असला तर.'

तडक सर्किट हाऊस गाठलं. ४ वाजले होते. थोड्याच वेळात प्रेस कॉन्फरन्स होती. कर्फ्यू पास घेतला. रात्री गांधीनगरमध्ये रहायला येण्याचं आमंत्रण स्वीकारलं–सुनील सूदचे–गृहखात्यातील सचिव. आणि कॉन्फरन्स हॉलमध्ये जाऊन बसले. कोणत्याही पुढाऱ्याला शोभेल अशा थाटात पंत-साहेब ४ च्या ऐवजी ५ वाजता आले. पत्रकार, आमदार, मंत्री बरेच लोक जमले होते. गुजराथी शब्द एखादा परिचित कानावर पडत होता. सगळेच उत्सुक होते. दोन दिवसात पंतसाहेबांनी इतक्या भेटी घेतल्या, निष्कर्ष काय ?

पंतसाहेब रुबाबदार, देखणे, देह विस्तृत पण बेतात. मुत्सद्याला शोभेल असा थंड चेहरा, शांत उत्तरे. मूळ प्रश्नाला बगल देणारी. आल्या आल्या पत्रकारांवर आकडे फेकायला सुरुवात. डिसेंबरमध्ये गुजराथला फक्त १५००० टन धान्य पुरवठं झाला. जानेवारीला ५०,००० टन केंद्राकडून नक्की मिळ-तील. गुजराथची गरज १ लाख टन महिना एवढी आहे. आम्हाला जाणीव आहे. वगैरे वगैरे. पत्रकारांनी एकच गिल्ला केला. आकडे आम्ही नंतर मिळवू. परिस्थितीबद्दलचं तुमचं मूल्य-मापन काय ?

काही नाही. ह्या अन्न दंगली आहेत. अन्नपुरवठा ठीक झाला नाही. पण हे देशभर असंच असतं. रब्बीचे पीक येण्यापूर्वी खरीपाचा साठा संपत येतो. आणि टंचाई होते. ही सायकल अशीच आहे. आता मार्चमध्ये पुन्हा धान्य येऊ लागेल.

## आमचे आम्ही पाहून घेऊ

'तुम्हाला वाटतं, अन्नपुरवठा नीट झाला की परिस्थिती ठिकाणावर येईल ?' पत्रकार

'नक्कीच.'– पंत.

'असं ऐकतो की गुजराथ काँग्रेसमध्ये बरीच गटबाजी आहे, विशेषत: मंत्री-मंडळही विभागले आहे' – पत्रकार.

चिमणभाई पंताच्या डाव्या हाताला बसलेले. उजव्या हाताला उपमुख्यमंत्री कांतिलाल घिया.

'ती आमची अंतर्गत बाब आहे. आम्ही पाहून घेऊ. तुम्हाला सांगण्या-सारखं काही नाही.' – पंत

'केरळमध्ये नंबुद्रिपाद सरकार असताना अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. आणि कांग्रेसनेच जन आंदोलन करून अन्नदंगली घडवून

परिस्थिती हाताबाहेर गेली,' सरकार अकार्यक्षम ठरले या आरोपाखाली त्यावेळच्या केंद्रीय कॉंग्रेस सरकारने नंबुद्रिपाद सरकारला राजीनाम द्यायला लावला. राष्ट्रपती राजवट आणली. तुम्हाला नाही वाटत केरळसारखी परिस्थिती येथे निर्माण झाली आहे ?' पत्रकार.

'परिस्थिती तेवढी गंभीर नाही. दुसरं म्हणजे घटनेचे नियम पाळला पाहिजेत. सध्या चिमणभाईंच्या मागे १०५ कॉंग्रेस आमदार उभे आहेत. बहुमत बाजूचे असताना विधानसभा बरखास्त करता येणार नाही.'

'आणि विद्यार्थ्यांच्या मागणीचे काय ? सरकार भ्रष्टाचारी आहे. अंतर्गत सुरक्षा कायद्याचा ताळतंत्र सोडून (recklessly) उपयोग केलाय् ?' पत्रकार.

'याबाबत आम्ही तुमचे अगर विद्यार्थ्यांचे मत घेऊ इच्छित नाही. आणि विद्यार्थ्यांच्या हॉस्टेलला खास रेशन कोटा मंजूर केलाय्. त्याने त्यांचा प्रश्न नक्की सुटेल.'

'आणि एवढ्या लोकांचे बलिदान झाले त्याचे काय ?'

'त्याबद्दल निश्चित वाईट वाटतं, पण ४३ लोक मेले तर ४ पोलीस लोकांकडून मारले गेले.'

'तुम्ही केंद्रसरकारला काय सल्ला देऊ इच्छिता ? चिमणभाई सरकार जाण्याची शक्यता किती आहे ?'

'मला केंद्रसरकारला रिपोर्ट द्यायचाय्, तुम्हाला नव्हे. मी त्यांना जबाबदार आहे.' आणि पंतसाहेब उठून चालू लागले. पत्रकारांनी अडवलं,

'निदान नर्मदा प्रॉजेक्टबद्दल तरी आश्वासन द्या. आम्हा वर्तमानपत्रांना लवकर बातमी पाहिजे.' पंतसाहेब नुसतेच हसले.

कल्पना होतीच. या पत्रकार बैठकीतून हाती काहीच लागत नाही. फक्त या पुढाऱ्यांबाबत काही प्रतिक्रिया बनविता येतात. हुशार आहे, इंग्लिश छान बोलतो. राजकारणी बरा आहे. इंदिराच्या खास गोटातला दिसतो वगैरे.

कर्फ्यू तासभर उशिरा सुरू होणार होती. घरी जायला रिक्षा मिळायची मारामार. सर्किट हाऊस एका टोकाला. जो तो घरी जायच्या घाईत. रिक्षावालाही कबूल होईना. शेवटी विनवण्या केल्यावर अर्ध्या रस्त्यात सोडणारा एक मिळाला.

घराजवळच डॉ. अशोक मेहता-सोशॅलिस्ट पार्टीचे कार्पोरेटर रहातात. त्यांच्याकडे गेलो. तेथून घरी चालत जाता येणार होते. कर्फ्यू पास होताच. सनत मेहता आणि २०० अनुयायी ३ वर्षांपूर्वी प्रजा सोशॅलिस्ट पार्टीतून फुटून इंदिरा कॉंग्रेसला मिळाले. सनत मेहता घनश्यामभाई ओझा मंत्रिमंडळात पुरवठा खात्याचे मंत्री बनले. मात्र त्यांच्या जाण्यामुळे गुजराथमध्ये समाजवादी पक्ष जो दुबळा झाला तो कायमचाच. सध्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाबरोबर समाजवाद्यांनी तह केलाय. काही कार्यक्रमांसाठी एकत्र येण्याचा. पण डॉक्टरसाहेब त्यासंबंधी नाखूश दिसले. समाज-

वादी पक्षाचा या आंदोलनामध्ये खास कार्यक्रम नव्हता. पण १४ ऑगस्ट कमिटीबरोबर ते लोक काम करीत होते. पकडले गेले होते. डॉक्टरांच्या मते चिमणभाई मंत्रिमंडळ जाण्याची शक्यता फार कमी होती. ◻

# दिनांक ३० जानेवारी : रात्री मुक्काम गांधीनगर

गांधीनगर ही मुद्दाम बांधलेली गुजराथची राजधानी. मुंबई महाराष्ट्रात जाण्याची गुजराथने परवानगी दिली एका अटीवर. २० कोटी रुपये केंद्राकडून मिळवले नवी वसाहत बांधायला. जसे हरयाणाला मिळाले. चंदिगडच्या बदल्यात. आधी काँग्रेसची मंडळी नाराज होती शहरापासून दूर जायला. पण आज हेच २० मैल दूर असलेले गांधी नगर मंत्रिमंडळाला स्वर्गवत् वाटतंय. नाही म्हटलं तरी सचिवालयावर मोर्चे आणणे जड जाते हो! शिवाय बससर्व्हिस सरकारच्या हातात. बंद म्हटलं की गांधीनगरचे रस्ते बंद. गांधीनगरची हद्द सुरू होते तेथे पोलिसांचा पहारा. जनतेपासून दूर, अभेद्य, मजबूत,सुरक्षित. सकाळी उठून फिरायला गेलो तेव्हा या स्वर्गनगरीचे सौंदर्य नजरेत भरत होते. गावात गोळीबार होत होता. दगडफेक चालू होती. पण येथे सारं कसं शांत शांत. अं ! कार्यक्षमतेने काम करायचं, महत्त्वाची देवाणघेवाण करायची [टेबलाखालीसुद्धा हात घालायला नको] म्हणजे असा हस्तिदंती मनोरा हवाच. तरीसुद्धा आश्चर्य म्हणजे सकाळी ११ वाजता एक ५० महिलांचा मोर्चा विधानसभेवर आलेला दिसलाच. गांधी नगरमध्ये रहाणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या बायका होत्या म्हणे त्या. ३० जानेवारीला शहीद दिन पाळण्यात येतो. पहिल्या बेताप्रमाणे अहमदाबादहून गांधीजींच्या पुतळयापासून मोर्चा निघणार होता. दांडीयात्रेचा ऐतिहासिक मार्ग मुक्रर झाला होता आणि गांधी नगरला येऊन मेमोरंडम देण्याचा बेत होता. पण कर्फ्यूमुळे आणि १४४कलमामुळे सारंच दडपलं गेलं. लोकांचा तो एक महत्त्वाचा आरोप होता. आमचे एकत्र येण्याचे, आमची मते मांडण्याचे, निदर्शने करण्याचे सनदशीर लोकशाही हक्क कायम ठेवा. आमचा राग आम्हाला प्रदर्शित करू द्यात. म्हणजे हिंसा कमी होईल.

सुनील सूद आणि गाडीत त्यांच्याबरोबरचे अधिकारी—चर्चेचे सार एकच—गुजराथची महिना गरज १ लाख टन धान्याची—म्हणजे स्वस्त धान्याच्या दुकानातून पुरवठा करण्याची. त्यापैकी ३०,००० टन गुजराथ सरकारने जमवायचे. ७०,००० टन केंद्राने पाठवायचे. आजकाल केंद्रसरकार अळंटळं करतंय. मागच्या महिन्यात जेमतेम १५,००० टन मिळालं. बरं, गुजराथ सरकारला डायरेक्ट खरेदी करायची

परवानगी नाही. हरयाणाच्या बाजारात बाजरी १०० रु. क्विंटलने मिळतेय. आम्ही आमच्या व्यापाऱ्यांना स्मगलिंगला परवानगी देतो. येथे आणेतोवर भाव १७०–१८० रु.पर्यंत जातात. ही झोन पद्धती चुकीची आहे. सरप्लस धान्य असलेली राज्ये धान्यसाठे बाहेर काढीत नाहीत. अडवून ठेवतात. आता गुजराथ सरकार संकटात आहे, धान्य विकत घ्यायला केंद्र सरकारने परवानगी दिली अशी बातमी आल्याबरोबर हरयाणाच्या बाजारातले बाजरीचे भाव वाढले.

'अच्छा, लेव्हीबद्दल तुमचे मत काय? महिना ३०,००० टनाचा तुमचा कोटा तरी तुम्ही पूर्ण केला का?'

'लेव्हीचे भाव इतके कमी असताना शेतकऱ्यांकडून अपेक्षा करणे चूक होईल. पंजाबमध्ये गहू उत्पादनाचा खर्च कमी आहे. भाव त्यावरून ठरविले जातात. गुजराथमध्ये तांदूळ, गहू या दोन्ही पिकांना खर्च जास्त येतो. त्यांना सरकारने देऊ केलेले भाव पुरत नाहीत. केंद्र सरकारचे अन्नधोरण चुकीचे आहे. त्यांचे दडपण राज्य सरकारवर पडतं.'

'अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराचे काय? अधिकारी पैसे खातात आणि लेव्हीमध्ये सूट देतात असे ऐकतो.'

'थोडेफार पैसे खात असतीलही. पण शेवटी खेडेगावात दादागिरी या शेतकऱ्यांचीच चालते. अधिकारी काय करतील? मोठ्या शेतकऱ्यांच्या मंत्र्यांशी ओळखी वगैरेही असतात.'

'चिमणभाई मंत्रिमंडळ खरोखरच भ्रष्ट आहे का?'

'सर्वच सत्तेवरील लोक थोडेफार भ्रष्ट व्यवहार करतच असतात. तेवढंच, त्यांच्याबाबत काही खास आरोप करता येणार नाहीत.'

थोडक्यात सरकारी अधिकारी तोलून मापून बोलतो. पोलिसांच्या बातम्या, भाषणांचे रिपोर्टस् यावर विश्वास ठेवतो. अधिकारावर असलेल्या पक्षाशी तो एकनिष्ठ असतो. ◻

---

# ३१ जानेवारी १९७४

---

आज कर्फ्यू जरा लवकर उठली होती. तरी गांधीनगरहून परत येऊन आंघोळ, जेवण उरकून बाहेर पडायला एक वाजला. गांधीनगरहून येताना पोलीस कमिशनरच्या ऑफिसात जाऊन गेल्या महिनाभराते शहरात झालेल्या प्रसंगांची, पकडापकडीची आकडेवारी आणली.

आज वसंत गजेंद्रगडकर–गुजराथ प्रांताच्या जनसंघ शाखेचे सेक्रेटरी–यांच्याशी भेट ठरली होती–

सत्तारूढ काँग्रेस खालोखाल, काँग्रेस (O) आणि जनसंघ या दोन्ही पक्षांची संघटना गुजराथेत चांगली आहे. सध्याच्या आंदोलनात जनसंघाचा बराच पुढाकारही आहे. पण तरीसुद्धा या

घटकेला हे आंदोलन जनतेचे स्वयंभू आहे. जनसंघाने काही ठिकाणी स्फूर्ती दिली. सुरुवात केली. पण जाळपोळ लुटालूट यांना कधीही उत्तेजन दिले नाही, केंद्रीय सरकारने मात्र जनसंघाला बदनाम करण्यासाठी सगळा आरोप ढकलला आहे. '...

'अहो पण मी तर म्हणेन की हे श्रेय आहे. जनताभिमुख पक्ष असल्याचा हा पुरावा आहे.'

'हो, तसं तर आहेच. पण लोकक्षोभाची किंवा परिस्थितीच्या स्फोटकपणाची आम्हालाही कल्पना आली नाही. आम्ही डिसेंबरपासूनच भाववाढीविरूद्ध आंदोलने चालू केली होती. पण तो आमच्या लोकजागृती कार्यक्रमाचा एक भाग म्हणून. खराब धान्याच्या भाकऱ्या करून त्या सरकारी अधिकाऱ्यांना ठिकठिकाणी खायला घालणे, कलेक्टरच्या ऑफिसला कुलूप घालून अकार्यक्षमतेबद्दल निषेध व्यक्त करणे, माणशी २।। किलो धान्य मिळाले पाहिजे या मागणीसाठी ठिकठिकाणच्या सरकारी कचेऱ्यांवर मोर्चे नेणे. १६ डिसेंबरला आम्ही बंदचे आवाहन केले होते. आणि गुजराथभर चांगला प्रतिसाद मिळाला. अर्थात त्यात आमच्या कामाला १०० टक्के श्रेय नाही. लोकच गांजलेले होते. ते आजकाल कोणाचेही ऐकतात. पण सौराष्ट्रमधला लढा मात्र बराचसा जनसंघाच्या नेतृत्वाखाली म्हणता येईल. त्या भागात ठिकठिकाणी म्युनिसिपालिटीमध्ये जनसंघाचे बहुमत आहे. आणि एकूणच गुजराथभर आमचे बहुमत वाढताना दिसून येतंय्. जानेवारीमध्ये आमच्या आंदोलनाने तीव्र स्वरूप घेतले त्याला अगदी लगेचच कारण घडले जैनपूर तालुक्याच्या गावच्या प्रसंगाचे. २२००० लोकवस्तीचे गाव, आम्ही ४००० लोकांचा मोर्चा सकाळी काढला. बंदचाही आदेश होता. पोलिसांनी बऱ्याच लोकांना अटक केली. वायकांनाही अटक झाली. मोर्चा संपला. आणि नंतर दुपारी एस. आर. पी. नी आक्रमक पवित्रा घेतला. रस्त्यात दिसेल त्याला मारत सुटले. गोळीबाराच्या फैरी, एवढंच नव्हे तर पोलिसांनी लुटालूट केली, लोकांची मनगटी घड्याळे काढून घेतली, पाकिटे मारली, दुपारी १२ ते रात्री ८ पर्यंत हैदोस चालू होता. म्हणजे मोर्चा शांतपणे पार पडला. लोक घरोघर पांगले आणि हे पोलिसी अत्याचार सुरू झाले. हा प्रसंग ७ जानेवारीचा. याचा निषेध करण्यासाठी जनसंघाने मोहीम आखली. एकूण १३०–१४० गावी बंदचे यशस्वी कार्यक्रम केले. त्यापैकी फक्त राजकोटला जाळपोळ झाली. भावनगरचे आंदोलन बरेच तीव्र होते.'

'सध्या तुमची मागणी काय?'

'भाववाढ रोखा, माणशी २।। किलो धान्य द्या, पोलिसी अत्याचाराची न्यायालयीन चौकशी करा. एवढ्याच आधी आमच्या मागण्या होत्या. आता मात्र चिमणभाई मंत्रीमंडळ हटवा, विधानसभा बरखास्त करा आणि नव्या निवडणुका घ्या, या मागणीपर्यंत आम्ही आहोत.'

'तुम्हाला नुसतीच राष्ट्रपती राजवट नको आहे?'

'निश्चित नको आहे. सध्याच्या काँग्रेस आमदारांपैकी सगळेच भ्रष्टाचारी, पैसेखाऊ आहेत. त्यातल्या कोणाचेही सरकार बनले तरी रडकथा तीच रहाणार. आणि लोकशाहीवर आमचा विश्वास आहे.'

'नव्या निवडणुकांमध्ये तुमच्या किती जागा वाढतील असा तुमचा अंदाज आहे?'

'माझ्या अंदाजाप्रमाणे विधानसभा बरखास्त व्हायची शक्यता खूप कमी आहे. पण नव्या निवडणुका झाल्याच तर ३ च्या ऐवजी आम्ही ३०–४० पर्यंत तरी नक्की पोचू.'

'तुमचे व काँग्रेस (O) चे मिश्र-सरकार बनण्याचे चान्सेस किती?'

'काँग्रेस (O) आणि काँग्रेस (R) यांचीच युती व्हायची शक्यता अधिक. त्यामुळे आमचे मिश्र सरकार बनविण्याची शक्यता कमीच.'

'अहमदाबादमध्ये किंवा गुजराथेत इतरही अनेक ठिकाणी चाललेल्या विद्यार्थी आंदोलनामध्ये तुमचे सहाय्य किती?'

'नवनिर्माण युवक मंडळात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे एकदोन प्रतिनिधी आहेत. चंद्रकांत शुक्ल, अरुणा ओझा वगैरे. पण त्यांच्या सगळ्या कार्यक्रमांना आमची संमती नाही. त्यांच्या मागण्यांना पाठिंबा आहे. हॉस्टेलला रेशनकोटा मिळावा, मंत्रीमंडळाने राजीनामा द्यावा. पण मंत्रीमंडळ राजीनामा देत नाही तोपर्यंत विद्यापीठ बंद ठेवा अशी त्यांची मागणी आहे. ती आम्हाला मान्य नाही. आम्ही अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे उपोषणाचे कार्यक्रम केले होते. आमच्या मुलांनी भाषणे केली.'

'थोडक्यात नवनिर्माणयुवक समितीशी तुमचे आता सहकार्य नाही. त्यांच्यावर तुमचा प्रभाव नाही. '१४ ऑगस्ट कमिटी'चा त्यांच्यावर प्रभाव आहे हे बरोबर का?'

'थोडेफार खरे आहे. पण तोही काही विद्यार्थ्यांवर, मनीषी जानी वगैरे. मला तर संशय आहे. चिमणभाई सरकारचा पाठिंबा काढून घेतलेला हा जो २५ काँग्रेस आमदारांचा गट आहे त्यांनीच या विद्यार्थ्यांना हाताशी धरले आहे. रत्तुलाल अडाणी हे त्यांचे पुढारी. ते विद्यार्थ्यांना फूस लावतात. पोस्टर्स करायला, बॅनर करायला पैसे देतात.'

'म्हणजे हे विद्यार्थीही भ्रष्ट व्हायला लागले तर!'

'नाही. नाही. ते अजून तरी कोणाला विकले गेले नाहीत. पण ही छोटी मोठी मदत ते घेतात. पण त्यांची भाषणे भडक असतात.'

'सध्याचे आंदोलन हे विद्यार्थ्यांचे आहे की जनतेचे आहे? भाववाढीविरुद्ध आहे की भ्रष्टाचाराविरुद्ध आहे?'

'हे आंदोलन जनतेचे आहे. विद्यार्थी जनतेचा एक भाग म्हणून येत आहेत. अहमदाबादमध्ये त्यांच्यावर थोडाफार

इतर प्रभाव असला तरी गुजराथेत इतर ठिकाणी विद्यार्थी स्वयंभूपणे एकत्र आले. आणि आंदोलनाचा रोख ५० टक्के महागाईविरोधी आणि ५० टक्के एस. आर. पी. च्या अत्याचारांविरोधी असा आहे. 'सैजपूर बोगा' नावाच्या गावी गर्ब्याचा कार्यक्रम होता. बायका गर्बा नाचताना एस. आर. पी. आले आणि त्यांनी बलात्कार करण्याचे प्रयत्न केले. याविरुद्ध तक्रार नोंदविली पण अजून काही कृती केली नाही. सरकार त्यांना पाठिशी घालतं हो.'

'जनतेला धान्य मिळत नाही याला कारण थोड्याफार प्रमाणात शेतकरीही आहे. शेतकरी लेव्ही देत नाही. गुजराथमध्ये अॅन्टी लेव्ही आंदोलन बार्डोलीला झाले. जनसंघाचा त्याला पाठिंबा होता. तेव्हा एकीकडे सरकारने स्वस्त दरात जनतेला धान्य दिले पाहिजे, भाववाढ रोखली पाहिजे असे सांगून तुम्ही जनतेचे उठाव करता. दुसरीकडे शेतकऱ्यांना पाठिंबा देता, हे कसं?'

'अहो शेतकऱ्याला योग्य भाव मिळालेच पाहिजेत. तरच तो धान्य पिकवील. नाहीतर तो सरळ कापूस, भुईमूग वगैरे पैसेवाली पिकं घ्यायला लागेल. आमचं म्हणणं सरकारने प्रॅग्मॅटिक, व्यवहारवादी असलं पाहिजे. समाजवादाची खोटी तत्त्वे नकोत. खुला बाजार करा. सरकारने खुल्या बाजारात एक गिऱ्हाईक म्हणून यावं खरेदी करून लोकांना वाटावं. किमती नक्की खाली येतील. काळाबाजार होणार नाही. किंवा सरकारने व्यापाऱ्यांच्यावर लेव्ही बसवावी. सरकारला धान्य जमविणं जमत नाही. मग निदान व्यापाऱ्यांना तरी जमवू द्या असे आमचे समस्येला रोखठोक उत्तर आहे. माणसाचा स्वभाव तर बदलता येत नाही. शिवाय सरकार लबाड आहे. गव्हाची लेव्ही, तांदुळाची लेव्ही. मग भुईमुगाची लेव्ही का नको? आज तेलाचीही टंचाई आहे. कारण तेल व्यापाऱ्यांनी चिमणभाईंना ४५ लाख रुपये मिळवून दिले, यू. पी. मधील निवडणुकांसाठी. त्यांना खुला व्यापार. दुसरा प्रश्न असा, कॅनडातून गहू आम्ही आयात करायला तयार आहोत. तेथल्या शेतकऱ्याला १३५ रुपये क्विंटल भाव. येथल्या शेतकऱ्याला ७६ रुपये क्विंटल भाव. येथल्या शेतकऱ्यालाच भाव वाढवून दिला तर काय हरकत आहे? म्हणजे प्रश्न खरोखर भ्रष्टाचाराचा आहे. आम्ही किसान संमेलने भरवतो. शेतकऱ्यांचे प्रश्न समजावून घेतो.'

## वामनकुमार

वसंतभाईंचे आर्ग्युमेंट सोपे वाटत होते. सरळ होते. पण यासंबंधी चांगली चर्चा पुढे बडोद्याला मकरंदभाई देसाई या जनसंघाच्या कार्यकर्त्याशी झाली. त्याचे वृत्त पुढे देईनच. जनसंघाच्या कार्याची पद्धतीही त्यांच्या चर्चेतून अधिक सुस्पष्ट झाली.

३१ जाने.–दुपारी ३ वाजता. वसंतभाईंच्या घरातून बाहेर पडता पडताच ठरविले आता फोटो मिळवायचे आणि अगदी सामान्य जनतेला–रस्त्यांतल्या माणसाला भेटायचे फोटोग्रोफरला दंगलीचे मुख्य केंद्र चांगलेच परिचित

होते. त्याने नेमके दर्यापूर–वाडीगाम भागात सोडले. त्याचा निरोप घेतला आणि मी तेथल्या परिस्थितीचा अंदाज घेऊ लागले. हा भाग रणांगण बनला होता. एक जुने कोसळलेले घर, जवळ जवळ जमीन दोस्त झालेले. मध्यभागी होते. दगडविटांचा स्टॉक अगदी भरपूर हाताशीच होता. मनात आलं, पोलिसांना जर खरोखरीच दगडांचा मारा चुकवायचा होता तर पहिला हा ढीग साफ करायला हवा होता. कारण अहमदाबादला सोडावॉटरच्या बाटल्यांचा वापर मुंबई इतका सढळ नाहीय. येथे नातं मातीशीच. या भागातले चारजण गोळी लागून ठार झाले होते. दोन ठिकाणी तरी त्यांच्या शहीदस्मृती नजरेस पडत होत्या. एका ठिकाणी काळे झेंडे लावून दोन काठ्या क्रॉस करून ठेवल्या होत्या. एका ठिकाणी भिंतीवर दुःखद बातमी होती. वामनकुमार प्रजापती दिनांक २४ च्या गोळीबारात ठार झाला. देव त्याच्या आत्म्याला शांती देओ. पुढे पणतीचे चित्र.

त्याच घरात शिरले. शोकप्रदर्शनासाठी घरातील स्त्रिया काळी पातळे नेसून बसल्या होत्या. माहिती विचारायला धीर होत नव्हता. दुःख ताजं असणार. पण मी पत्रकार आहे. मुंबईहून आले आहे. सांगितल्यावर शेजारपाजारचे बरेचजण जमले. वरच रहाणारे माध्यमिक शिक्षक पोपटलाल एन. पटेल आले.

दिनांक २४चा प्रसंग असा. त्यादिवशी नवनिर्माण समितीने चिमणभाईंच्या प्रतिमेची मिरवणूक काढून ती जाळण्याचे आवाहन केले होते. दुपारी ५ वाजता लोकांनी प्रतिमा तयार केली. वामन कुमारनेही हातभार लावला. तो रेतीचा धंदा करी. कॉन्ट्रॅक्टरला गाढवावरून रेती वाहून नेऊन द्यायची. आज त्यानेही सुट्टीच घेतली होती. तीन चार हजार लोक तरी जमले होते. बायकाही मिरवणुकीत सामील होत्या. मिरवणूक वाडीगामच्या बाजूला निघाली. त्या भागातील लोकांनीच ती संघटित केली होती. गंमत म्हणजे मोहल्ल्या मोहल्ल्यातून समित्या तयार झाल्या आणि आपल्याला नवनिर्माण युवक समितीच्या शाखा म्हणवून घ्यायला लागल्या. संध्याकाळी ५ वाजता अचानक कर्फ्यू चालू झाली. पोलीस आले. त्यांनी मोर्चा अडविला. सगळ्यांनी आग्रह धरला, आम्हाला प्रतिमा मैदानात जाळायची आहे. जाळू द्या. पोलिसांनी एकलं नाही, लाठीमार, अश्रुधूर आणि मग गोळीबार. तोपर्यंत लोकांनीही आपापल्या जागा घेतल्या होत्या. दगडांसकट. पोलिसांनी वर नेम धरून गोळीबार केला. पुढूनही मोर्चा अडविला. मागूनही पोलिसांनी साखळी केली. जालियनवाला बागसारखे कैचीत पकडले. छोट्या छोट्या गल्ल्या. अगदी भरगच्च वस्तीचा भाग. चारजण मारले गेले. वामनकुमार त्यातलाच एक जागच्या जागीच मेला.

'याच वस्तीत एक सब इन्स्पेक्टर आणि एक कॉन्स्टेबल मारले गेले का ?'

'हो हो, येथेच, पण ते दगडांनी

नाही मारले गेले. कोणीतरी गोळ्या झाडल्या. कोणी ते कळलंच नाही. खाडिया गोलवाल भागामध्ये एक कॉन्स्टेबल दगड पडून मेला. त्या भागातले लोक चांगले तयार आहेत.'

'तुमच्या भागात कोणत्या पक्षाचे पुढारी येतात ?'

'गोळीबारानंतर हितेन्द्रभाई देसाई हिंडून गेले. जनसंघाचा माणूस कोपऱ्यावर रहातो, पण भाषण वगैरे कोणी नाही केलं.'

'मग तुमचा नेता कोण ?'

'आमचे आम्हीच. चिमणभाई सरकार भ्रष्टाचारी आहे. त्यांनी आम्हाला धान्य दिलं नाही. दररोज सगळ्या गोष्टीचे 'भाव वाढताहेत. सरकार पैसे खाते आणि भाववाढ होते. आम्ही शुद्ध सरकार आणणार. आम्हाला नव्या निवडणुका पाहिजेत.'

'कोणत्या पक्षाला मत देणार ?'

'पक्ष आम्ही ओळखीत नाही. चांगल्या माणसाला मत देणार. आता बुद्धिजीवी लोकांनी पुढे झालं पाहिजे आणि राजकारणात भाग घेतला पाहिजे.'

'एस. आर. पी. वर तुमचा राग आणि लष्करावर प्रेम कसे ? तुम्हाला लष्कराची राजवट आवडेल ?'

'अहो एस आर. पी. वर अधिकार चिमणभाईचा. तो हुकूम देतो. एस. आर. पी. सांगितल्याहून दुप्पट मारतात. घराघरातून जाऊन मारतात. उगीच गोळीबार करीत सुटतात. लष्कराचे आम्ही स्वागत करतो. आमचे त्यांच्याशी भांडण नाही. लष्कर आहे तोवर आम्ही शांत राहू. लष्कर गेले की आम्ही आंदोलन पुन्हा चालू करू. चिमणभाईला वाटलं आपण लष्कर आणू. ते लोकांना बरोबर सरळ करील. पण आम्ही लष्कराशी दोस्ती केली.'

## पोलिसांना प्रवेशबंदी

मला या युक्तीवर हसावं की रडावं तेच कळेना. म्हणजे माझ्या मनात भीती होती, लोकांना लष्करी हुकूमशाही, लोकशाहीपेक्षा बरी वाटतेय की काय ? पण गोष्ट तशी काही नव्हती. ही केवळ एक चाल होती आणि लोकांना त्याची जाणीव होती. म्हणजे एकीकडे आंदोलनात सुसूत्रता नाही म्हणावं तर काही गोष्टी उत्स्फूर्तच घडत होत्या. आपापसात समजत होत्या.

नंतर खाडिया गोलवालकडे दौरा वळविला. येथील रचना फार मजेची आहे. चक्रव्यूहासारख्या येथल्या एकात एक गुंतणाऱ्या गल्ल्या. एका तोंडातून माणूस आत शिरला की मैल दीड मैल दुसऱ्या टोकाला बाहेर पडणार. येथील रहिवाश्यांची विलक्षण एकी. अगदी १९४२ च्या चलेजावच्या संग्रामापासूनचा या भागाला इतिहास आहे. गोऱ्या सोजिरांनाही येथील लोकांनी पाणी पाजल्याचे अभिमानाने सांगतात. येथीलच एका गल्लीच्या तोंडाशी लोकांनी नाके उभारले होते. कोणाही पोलिसाला त्याच्या आत यायची बंदी. कोणी आलाच तर वरून-धाब्यावरून दगडांचा भडिमार. येथेच एका पोलिसाला दगडांच्या ४२ जखमा

झाल्या होत्या. तो हॉस्पिटलमध्ये मेला.

ह्या भागात मुख्यत्वे मध्यमवर्गीय, कनिष्ठ मध्यमवर्गीय लोक रहातात. कामगारांचा हा भाग नाही. जनसंघाचा येथे प्रभाव समजला जातो, पण सामान्य माणसाला जनसंघ पक्षाची धोरणे काय, भूमिका काय याची खास माहिती नाही.

लोकांना विचारले, 'तुम्हाला खुला बाजार पाहिजे की सरकारकडून स्वस्त दराने धान्य पाहिजे?'

'ते आम्हाला माहीत नाही. सरकारची जबाबदारी आहे आम्हाला स्वस्त दरात धान्य पुरविण्याची. मग ते खासगी दुकानातून मिळो किंवा सरकारी दुकानातून मिळो.'

'श्रीमंत शेतकरी सरकारला धान्य देत नाही. मग सरकार कसं तुम्हाला धान्य देणार? तुम्हाला शेतकऱ्यांचा राग येत नाही का?'

'मग सरकारने श्रीमंत शेतकऱ्यांनी भाग पाडावं धान्य द्यायला. बाकीचं धान्य खुल्या बाजारात विकून त्यांना जास्त पैसे मिळतातच की. काही नाही, सरकारला थोडे पैसे दिले की सरकार सूट देतं. तेलाच्या व्यापाऱ्यांनी केलं तसं. सरकारच भ्रष्ट आहे.'

'आणि व्यापारी?'

'त्यांचा तर धंदाच आहे पैसे कमवायचा.'

'लोकांनी दुकानं कोणाची लुटली?'

'अशी मुद्दाम दात ठेवून लुटली नाहीत. कोपऱ्यावर जे दुकान असेल ते लुटले. जुना स्वस्त दरातील मालसुद्धा तो दुकानदार चढ्या भावाने विकतो. लोकांचा त्यांच्यावर राग होताच.'

'कोणी भाग घेतला जास्त करून?'

'अगदी गरीब, बॅकवर्ड क्लासमधल्या लोकांनीच दुकानं लुटल्याचा फायदा घेतला.'

'तुमचीही मुले होतीं?'

'आमच्या भागातील मुलं असायची थोडी. दुकानं फोडायला ती जायची. पण लुटीमध्ये फार भाग नसे त्यांचा.'

'नवनिर्माण समितीचे विद्यार्थी असायचे त्यात?'

'कॉलेजचे विद्यार्थी नसत फार. हीच मॅट्रीक नापास झालेली, रोजावर काम करणारी पोट्टी. १६–१७ वर्षांची. त्यांनीच वांडपणा केला जास्त.'

'आता दुकानातून धान्य मिळायला लागलं तर आंदोलन मागे घेणार?'

'आता हे सुरूच राहील. चिमणभाई सरकार जाईतोवर आम्ही लढणार. सरकार आमच्यावर जमावबंदी घालतं. आम्ही सरकारच्या पोलिसांवर प्रवेशबंदी घालणार.'

पोलिसांशी बोलायचा प्रयत्न केला. त्यानी उत्तर दिलं नाही. पोलीस कचेरीत जाऊन विचारा असे उत्तर मिळालं.

दुकानदाराशी बोलायचा प्रयत्न केला. त्याचं उत्तर, गुंड लोक फायदा घेतात परिस्थितीचा. एकूण वातावरण मात्र नाराजीचं होतं. अहमदाबादमध्ये ७०० दुकानं लुटली गेल्याचं सांगितलं. आश्चर्य म्हणजे बहुतेक सर्व छोटी दुकाने होती. बडोद्यात गोदामे लुटली गेली. पण अहमदाबादेत गोदामांकडे, मोठ्या घाऊक व्यापाऱ्यांकडे लोकांची नजर

अजूनपर्यंत तरी पडली नाही. कोणत्याही पक्षाने तसा कार्यक्रमही घेतला नव्हता. वेपारी महाजनने पत्रक काढून दुकाने बंद ठेवण्याची धमकीही दिली होती. त्यांना पोलीस संरक्षण हवे होते. मोठ्या व्यापाऱ्यांच्या गोदामांवर पोलीस बंदोबस्त पक्का होता. छोटा व्यापारी भरडला जात होता. आपल्याकडे शिवसेना करते तसाच हा प्रकार दिसला. काही दुकानात जाऊन भावांची चौकशी केली. काही ठिकाणी माल नसल्याचे सांगण्यात आले. काही ठिकाणी बाजरी १ रु. ६० पैसे किलो होती. गहू २० किलोला ४०–४५ रु. असे भाव होते. दूध तर फक्त १ रु. ४० पैसे लिटर. महाराष्ट्राच्या मानाने भाव स्वस्त वाटले. रॉकेलची मात्र बरीच टंचाई होती. दुसरी महत्त्वाची गोष्ट–सबंध गुजराथमध्ये ६००० रु. च्या खाली उत्पन्न असलेल्या लोकांनाच रेशनकार्ड देण्यात येते. त्यावरील लोकांनी खुल्या बाजारातून धान्य घ्यावे अशी अपेक्षा होती. मात्र रेशनकार्डावर माणशी महिना ३०० ग्रॅम गहू, २०० ग्रॅम तांदूळ इतके कमी धान्य मिळत होते. त्यामुळे लोक नाराज होणं स्वाभाविक होतं.

त्या दिवशीचे स्वातंत्र्य संपलं. संध्याकाळी सहा वाजताच पुन्हा सामसूम. प्रत्येकजण आपल्या खुराड्यात. चार भिंतींच्या आत. डॉ. मावळंकरांच्या पत्नी मला सांगत होत्या, ७१ साली भारत पाकिस्तान युद्धातही असंच वातावरण असायचं. त्याची आठवण येत्येय. तेव्हा जरा प्रकाशाची तिरीप बाहेर न जाऊ देण्याची काळजी घ्यावी लागायची एवढाच फरक. बाकी घरात चर्चा, युद्धाच्या बातम्या. आताही सात वाजता प्रादेशिक बातम्या ऐकायला सगळे जमायचे. भावनगरला गोळीबार. मोरवीला पुन्हा दंगल. सुरतमध्ये विद्यार्थ्यांची मिरवणूक. बातम्या येतच रहायच्या. दिवाळीत जसे फटाक्यामागून फटाके फुटत रहातात. दोन क्षण शांत– तेही वाट पहात रहाण्यासाठी.

## सुपीक कल्पना

आजपासून गावात ‘चिमण रहात फंड’ सुरू झाला होता. कल्पना फार सुपीक होती. ‘बोल, चिमणभाई, तुला पैसेच खायचे आहेत ना! मुख्यमंत्र्यांची खुर्ची सोडायला तुला किती पैसे पाहिजेत? तुझा आकडा सांग, तुझी किंमत सांग. जनता पैसे गोळा करून तुझी रक्कम पूर्ण करील. पण तू आता जा!’

दुसरी गंमतीची गोष्ट सांगितली गेली. चिमणभाईवरचा लोकांचा विश्वास उडाला. चिमणभाई मुख्यमंत्री म्हणून मेला. म्हणून गावात पुष्कळांनी साबरमतीवर जाऊन सुतकाची आंघोळ केली. १० दिवस सुतक पाळलं. चिमणभाईंच्या प्रतिमा तर गल्लोगल्ली शेकडोंनी जाळल्या. जितक्या शांततामय मार्गांनी राग प्रकट करणं शक्य होतं तितक्या मार्गांनी राग प्रकट होत होता. गुजराथ शेवटी गांधीजींचा वारसा सांगणारा प्रांत. कोणीतरी विनोद केला, इथल्या कम्युनिस्टांनासुद्धा गांधीजींचे नाव घेतल्याशिवाय पुढे जाता येत नाही. गांधीजींचा अतिशय प्रभाव असलेली.

गुजराथमधील एक मोठी कामगार संघटना मजूर महाजन. १९१९ मध्ये तिची स्थापना झाली. आजतागायत वाटाघाटींनी मागण्या मिळविण्याचे आणि बहुधा संप, बंद वगैरे लढाऊ मार्ग न हाताळण्याचे त्यांचे धोरण आहे. कापडकामगार बहुतेक या संघटनेचे सभासद आहेत. त्यांना वर्गलढा हा शब्दच माहीत नाही. गुजराथमध्ये एवढा संतापाचा डोंब उसळला पण मजूर महाजनने पत्रके काढण्याशिवाय काही केलं नाही. सध्या मजूर महाजन काँग्रेस (O) शी निष्ठा राखून आहे.

□

## १ फेब्रुवारी १९७४

अजूनपर्यंत नवनिर्माण युवक समितीच्या कोणाच विद्यार्थी नेत्याशी माझी मुलाखत झाली नव्हती. मी अस्वस्थ होते. येथल्या प्राध्यापकांची संघटनाही मोठी जहाल आहे असं ऐकलं होतं. त्या दिवशी सकाळी आठ वाजता अखेर 'मुकेश पटेल' भेटला. तो एक्झिक्युटिव्ह बॉडीमध्ये होता. फारच छान बोलला.त्याला एकूण परिस्थितीची, स्वतःवरच्या जबाबदारीची चांगली जाणीव होती. त्याने अर्थातच आपल्यावर कोणाचा प्रभाव असल्याचे कबूल केलं नाही. काही विद्यार्थी नेत्यांच्या व्यक्तिगत ओळखी होत्या–ट्रेड युनियनच्या लोकांशी, जनसंघाशी वगैरे. पण विद्यार्थ्यांनीच एकत्र बसून ठरविलं, आपलं लक्ष्य काय ? फक्त हॉस्टेलसाठी रेशनचा कोटा मिळविणं की या परिस्थितीला कारणीभूत असणारे सरकार दूर करणं ? एकमताने निर्णय घेतला, चिमणभाई हटाओ. जयप्रकाश नारायणजींकडून स्फूर्ती घेतली. विद्यार्थ्यांनीच आदर्श जपले पाहिजेत. आम्हाला व्हेस्टेड इंटरेस्ट काहीच नाहीत. आम्हाला स्वतःला विधानसभेत जागा नकोत. आम्हाला जीवन स्वच्छ बनवायचंय. लोकशाही हक्क जपायचे आहेत.

'तुमचा हिंसक मार्गावर विश्वास आहे ?'

'हिंसक कार्यक्रम आम्ही कोणी मुद्दाम घेतले नाहीत. आम्ही सिनेट-हॉलमध्ये सभा घेतल्या. भाषणे केली. विद्यार्थिनींनी काँग्रेस आमदारांना जाऊन बांगड्या दिल्या. कारण हे आमदार, जनतेचे प्रतिनिधी घाबरतात जनतेमध्ये यायला. आम्ही मौन मिरवणूक काढली. पाच-पाच सहा-सहा जणांचे गट करून बाजारात हिंडून व्यापाऱ्यांच्यावर वाजवी किंमतीने धान्य विकण्यासाठी दडपणं आणली. नुकतीच आम्ही २०० काळाबाजार करणाऱ्या व्यापाऱ्यांची यादी तयार करून पोलीस कमिशनरच्या हवाली केलीय्. पण या आमच्या कृतींना प्रतिसाद काय मिळाला ? जमावबंदी लाठीमार, भाषणबंदी, गोळीबार. लोक-

शाही हक्कांची पायमल्ली. मग कुठे कुठे हिंसेने प्रत्युत्तर मिळाले असेल. दगड फेकले असतील.'

'विद्यापीठातील रेकॉर्डस् कोणी जाळली? एल्. डी. कॉलेजमधील फर्निचर कोणी जाळलं?'

'काही विद्यार्थी वाह्यात आहेत. काही इस्ट आफ्रिकेतील वगैरे गुजराथी मुले येथे शिकायला असतात. आगाऊ असतात. त्यांनी जाळपोळ सुरू केली. पण आम्ही आमच्या भाषणातून कधीच प्रवृत्त केले नाही.'

'कामगारांनी तुमच्याबरोबर आंदोलनात भाग कसा घेतला नाही?'

'दिनांक २५ च्या बंदमध्ये कामगार होते. पण कामगारांनी काम केलंच पाहिजे. उत्पादन थांबवून चालणार नाही. आम्ही कधीही कुठच्याही कारखान्याच्या कामात, ऑफीसच्या कामात अडथळा आणला नाही.'

'प्राध्यापकांचा किती पाठिंबा?'

'जरूर आहे. पण त्यांनीही पाठिंबा आता जाहीर केला. ७–८ दिवसांपूर्वी सुरुवात आम्हीच केली. आणि आंदोलन अजूनही चालू राहील. चिमणभाई खाली आल्याखेरीज आम्ही कॉलेजमध्ये जाणार नाही.'

'एवढा तुमचा निर्णय पक्का होता तर तुमच्यापैकी काही दिनांक १५ ला चिमणभाईंनी बोलावल्यावर कशाला गेले त्यांच्याकडे? तुम्ही जात आहात याची कल्पना दिली होती सर्व विद्यार्थ्यांना?'

'चिमणभाईंनी एकजूट फोडायचा डाव घातला. सगळ्या कॉलेजचे जनरल सेक्रेटरी त्यांना भेटायला गेले. पण कशासाठी? आमच्या दोन विद्यार्थी नेत्यांना अटकेत ठेवलं होतं त्यांना सोडायचं आश्वासन मिळविण्यासाठी. आमची चाल बरोबर ठरली. विद्यार्थ्यांची सुटका झाली. मनीषी जानी बाहेर आला.'

'आता एकच प्रश्न. हे बारा सिनेट सभासद कसे निवडले जातात?'

प्रत्येक शाखेला एक प्रतिनिधी. कला, विज्ञान, वाणिज्य, इंजिनिअरिंग वगैरे. पोस्ट ग्रॅज्युएटसाठीही वेगळी जागा असते.'

'म्हणजे कला विभागाच्या विद्यार्थ्याला निवडून येण्यासाठी विद्यापीठातील जवळ जवळ ८० कॉलेजांना भेटी देऊन आपली उमेदवारी पटवून द्यावी लागते. बापरे. म्हणजे हे बरेच खर्चाचे काम आहे.'

'जनरल सेक्रेटरीच्या निवडणुकांनाच प्रत्येकी दोन-तीन हजार रुपये खर्च होतो. त्यातही परत पटेल जातीचा मुलगा वगैरे भानगडी असतातच'

'म्हणजे तुम्हीच तोंडाने कबूल करताय की निवडणुकांमध्ये दिसणारं राजकारण छोट्या प्रमाणात कॉलेजातही चालतं. खर्चही बराच होतो. मग तुम्हाला काय अधिकार भ्रष्टाचारी सरकार दूर करण्याचा?'

'बरोबर आहे तुमचा प्रश्न! पण याला इलाज काय? निवडणुकीची पद्धतच अशा तऱ्हेने ठेवलीय की त्यामध्ये पैशालाच वाव रहातो. ही पद्धतच

बदलायला हवी. त्यातूनही मनीषी जानी सारखा एखादा सच्चा मुलगा कमीत कमी पैशांवर निवडून येतोच.'

त्याला एका सभेला जायचं होतं. १४४ कलम जारी होतं. तरीही पत्रकार कॉलनीमध्ये सभा घ्यायचा प्रयत्न ते करणार होते. मीही जायचं ठरविलं. फक्त त्यापूर्वी प्राध्यापक मंडळाच्या सेक्रेटरीला भेटायचं होतं. अंबूभाई देसाई – एच्. के. आर्टस् कॉलेजमधील प्राध्यापक. तेही सभेला गेल्याचे कळले. घाईघाईने रिक्षा करून सभेच्या ठिकाणी पोचलो. तर दुरूनच खूपसे एस्. आर. पी. मैदानात जमलेले दिसले. लोकांची पांगापांग चालली होती. बहुधा लाठीमार होत असावा. जवळ जाऊन चौकशी केली तर कळलं कनुभाई शाह, आणखी कोणी प्राध्यापक व अशोक पंजाबी वगैरे चार विद्यार्थ्यांना पकडून नेलं. सभा झालीच नाही. हा अशोक पंजाबी नक्षलवादी असल्याचे सांगण्यात आले. नक्षलवादी म्हणजे काय तर भडक बोलतो, सरकारला लुटारू म्हणतो वगैरे लक्षणे ऐकायला मिळाली. तेथून सगळे लोक हायकोर्टात चालले होते. पीरजादा नावाचे प्राचार्य–त्यांच्यावर वॉरंट होतं. ते सध्या भूमिगत होते. पण त्यांनी रिट पिटिशन अर्ज दाखल केला होता. ते आज कोर्टात हजर होणार होते. कोर्टात चिक्कार गर्दी होती. विद्यार्थी, प्राध्यापक खचून भरले होते. पीरजादा कोर्टात आल्यावर घोषणांनी आवार दुमदुमले. प्रा. बत्रा यांच्याकडून थोडीशी गुजरात युनिव्हर्सिटी एरिया टीचर्स असोशिएशन (GUATA) बद्दल माहिती ऐकायला मिळाली.

या संस्थेने लढून बरेच हक्क मिळविले. सिनेटमध्ये आतापर्यंत फक्त प्राचार्य मंडळी आपोआप प्रतिनिधी म्हणून बसत. या संस्थेने शिक्षकांना प्रतिनिधित्व मिळवून दिले. २५० सभासदांच्या सिनेटमध्ये ४३ सभासद प्राध्यापकांचे प्रतिनिधी असतात. यामुळे यापुढे उपकुलगुरूपदाच्या निवडीवर निश्चित परिणाम होईल. सध्या कॉलेजच्या मॅनेजमेंटमध्ये प्राध्यापकांना अधिकार असावा म्हणून झगडा चालू होता. चिमणभाई पटेलांबद्दल बरीच नवीन माहिती मिळाली. चिमणभाई पटेल पूर्वीचे तथाकथित विद्यार्थीनेते. नंतर अर्थशास्त्राचे प्राध्यापक. नंतर गुजराथ प्रदेश काँग्रेसमध्ये स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न. गुजराथ विद्यापीठातील राजकारणात प्रामुख्याने भाग. आतापर्यंत ७–८ आर्टस व कॉमर्स कॉलेजे काढून तेथे आपल्या मर्जीतील चमचे प्राचार्य नेमले. त्यांच्यातर्फे गुजराथ विद्यापीठात आपले महत्त्व वाढविले. पूर्वीच्या घटनेप्रमाणे कोणीही प्राचार्य आपोआप सिनेटसभासद बने. आता मात्र त्यांच्यातही निवडणुकीने प्रतिनिधित्व मिळवावे लागते. चिमणभाईंच्या पत्नीही कॉलेजच्या प्राचार्या आहेत. शिवाय आर्टस कॉमर्स कॉलेजेसमधून पैसेही काढता येतात. सरकारी ग्रँटस् मिळतात.

मला गंमत वाटली, कोणे एकेकाळच्या विद्यार्थीनेत्याला आज

विद्यार्थ्यांच्याकडूनच शिव्यांचा वर्षाव मिळावा, विद्यार्थ्यांनीच त्याच्या आसना-खाली सुरुंगाची वात पेटवावी. त्याच बरोबर विद्यार्थी आणि प्राध्यापक आजच्या लढ्यात जे अभिनिवेशाने उतरले आहेत त्यांच्या तीव्र उद्रेकाचे कारणही कळलंय्. चिमणभाईला त्यांनी जवळून पाहिलंय.

दुपारी केशवभाई मावळंकर आणि देवेन ओझा यांच्याशी मुलाखत झाली. दोघांची प्रजासोशालिस्ट पार्टीची पार्श्व-भूमी. देवेनभाई हिंदुस्थान टाइम्सचे गुजराथ वार्ताहर. चिमणभाईच्या भ्रष्टा-चारांच्या आणखी काही कथा ऐकायला मिळाल्या.

## काही निष्कर्ष

निष्कर्ष बरेच स्पष्ट झाले. अहमदा-बादमध्ये आंदोलनाला दोन शक्तींची मदत आहे. दोघींचे उद्देश वेगळे. १ : काँग्रेसमधून फूटून बाहेर पडलेला गट—त्यांना मात्र चिमणभाई सरकार उलथून पाडावयाचे आहे. नवं मंत्रिमंडळ उभं करायचं आहे. तोपर्यंत राष्ट्रपती राज-वट. विधानसभा बरखास्त मात्र नको. कारण परत निवडून न येण्याची भीती. २ : विरोधी पक्ष—जनता यांना विधान-सभा बरखास्त हवी आहे. नवे प्रतिनिधी यायला पाहिजेत.

आणि केंद्रसरकारला आता फक्त भिजत घोंगडं ठेवावयाचं आहे. कमीत-कमी उत्तरप्रदेशच्या निवडणुका होई-तोंवर. शिवाय चिमणभाईनी इतकी आर्थिक मदत मिळवून दिलीय की त्यांचे मिंधेपण आहे. शिवाय इंदिरा लाट ओसरल्याची जाणीवही आहेच.

दंगली या फक्त १०,००० वर लोकसंख्या असलेल्या थोड्याफार शहरी-ठिकाणी प्रामुख्याने झाल्या—जेथे स्वस्त धान्याच्या दुकानातून लोकांना धान्य घ्यावे लागते, मध्यमवर्ग, छोटा, मोठा कामगार. खेडेगावामध्ये दंगलीचे लोण पोहोचले नाही. बार्डोली येथे झालेला संघर्ष पाटीदार म्हणजे श्रीमंत शेतकरी व शेतमजूर (हलपती) यांच्यामध्ये होता. व तो लवकर मिटला. त्याचे व सध्याच्या दंगलीचे नाते नाही. गुज-राथचा कामगार वर्ग हा राजकीय दृष्टया अजिवात जागृत नाही. अत्ताच्या आंदोलनात त्याचा भाग जवळ जवळ नाही. दगडफेक वगैरे मुख्यत: १६ ते २० वर्षे वयाच्या तरुण मुलांनी केली. प्रामुख्याने बेकार, नुकतीच मॅट्रीक झालेली, छोटयाशा कारखान्यातून काम करणारी, कामगार संघटनांच्या प्रवाहा-खाली नसलेली ही मुले. यांना प्रथमच अस्मिता दाखविण्याची, स्वत:चे अस्तित्व दाखविण्याची संधी मिळाली. स्वातं-त्र्याचा बोध झाला. आणि त्यांना मोठ्यांची सहानुभूती मिळाली. अहमदा-बाद मध्ये याच वर्गातील लोकांना पोलि-सांच्या दडपशाहीचा सर्वात जास्त त्रास झाला. तेथेच लोकांनी चिमणभाईंना 'दमनवीर चक्र' बहाल केले.

राजकीय पक्षांचे काम फार थोडे. विद्यार्थ्यांनी मात्र फार लवकर जहाल कार्यक्रम घेतले आणि त्यामुळे चळ-वळीचे सातत्य गमावण्याची पाळी आली. नाहीतर महागुजराथसारखे राज्यव्यापी मोठे आंदोलन येथे निर्माण

होऊ शकले असते.

महाराष्ट्र सरकारची राजकीय शक्ती साखर कारखान्यावर अवलंबून आहे. तशी चिमणभाईंची श्रीमंत शेतकरी, तेलाचे गिरणीमालक व व्यापारी यांच्यावर अवलंबून आहे. संघटना काँग्रेसची शक्ती मुख्यत: भांडवलदार वर्गांमध्ये होती: कापड गिरण्यांचे मालक कारखानदार वगैरे.

चिमणभाई मंत्रीमंडळातही फूट बरीच आहे. अमूल देसाई वगैरे गट असंतुष्ट आहे. त्याचे महत्त्वाचे कारण चिमणभाईंनी उत्तर प्रदेश निवडणुकीसाठी जे ४५ लाख रुपये जमविले ते स्वत:च्या नावे इंदिराबाईंना दिले. खरं म्हणजे ते सर्व मंत्री मंडळाच्या संमतीने व मंत्रीमंडळातर्फे जायला हवे होते. तेव्हापासूनच कुरकुर सुरू झाली. १०५ काँग्रेस आमदारांचा पाठिंबाही केवळ पैशाच्या जोरावर चिमणभाईंनी टिकविला आहे.

डॉ. वासुदेव त्रिपाठींना भेटले. मंत्रीमंडळाचा पाठिंबा काढून घेणाऱ्या २५ आमदारांपैकी ते एक. त्यांनी तर काँग्रेसी भ्रष्टाचाराला कंटाळून काँग्रेस पक्षाचाही राजिनामा दिलाय. एवढे धैर्य दाखविणारे थोडेच. त्यांना विचारले, 'हितेंद्रभाई देसाई, मोरारजीभाई यांच्या वेळी भ्रष्टाचार अजिबात नव्हता का?'

'तेही पैसे घेत असत पक्षासाठी, क्वचित स्वत:साठी पण कारखानदारांकडून गुप्तपणे. आता लेव्हीमुळे, तेलावरील निर्बंधामुळे भ्रष्टाचार शेतकऱ्याच्या, सामान्य माणसाच्या दारापर्यंत पोंहोचलाय. उघडावागडा झालाय. आणि सामन्य माणूस पेटून उठलाय.' □

## दिनांक २ फेब्रुवारी : बडोदे

ह्या दिवशी पहाटे सहा पासूनच कर्फ्यू उठविली होती. त्यामुळे बडोद्याला जाण्यासाठी सकाळची गुजरात एक्स्प्रेस नक्की केली. ७ ची गाडी. ९ वाजता बडोदा. सगळी इंग्लिश पत्रे विकत घेतली. गेले तीन दिवस गुजराथच्या राजकारणाची इतकी चर्चा केली होती, नावे परिचयाची झाली होती की आपोआप आत्मीयता वाढली.

पहिलीच बातमी – गुजराथ विद्यापीठाच्या प्राध्यापकांना जवळ जवळ १०० रु. महिना पगारवाढ सरकारने जाहीर केली होती. गुजराथ मधील सर्व विद्यापीठांच्या उपकुलरूंना चर्चेसाठी पाचारण केले होते. आणि विद्यापीठातील न शिकविणाऱ्या स्टाफला वाटाघाटीचे आमिष दाखविले होते. ह्या एकजूट फोडण्याच्या युक्त्या होत्या. प्राध्यापकांच्या महामंडळाने 'तरीही आंदोलन चालूच राहील' असा इशारा देऊन आपला लढाऊ बाणा दाखविला होता.

बडोद्यात गेल्या गेल्याच एक एक विचारणा करायला सुरुवात केली.

लढ्याचा सांचा तोच होता. ट्रेड युनियन्सनी कृति समिती स्थापन केली होती. महाराज सयाजीराजे विद्यापीठाचे विद्यार्थी एकत्र आले होते. त्यांचीही कृति समिती बनली. आणि जनतेनेही स्फूर्ती घेऊन आपल्या असंतोषाची उग्रता दाखविली. बडोद्याला पहिला प्रसंग १० जानेवारीला जनसंघाच्या मोर्चानंतर घडला. मोर्चा शांततेने पार पडला. पण नंतर दगडफेक, दुकानांची लुटालूट, पोलिसांचे 'धर आणि मार' धोरण, गोळीबार. दुसऱ्या दिवसापासून विद्यार्थ्यांचे आंदोलन. यूथ फेस्टिव्हल चालू होता, तो बंद करा म्हणून मागणी. हॉस्टेलच्या विद्यार्थ्यांनी एकदम दगडफेकच चालू केली. १३ जानेवारीला जाहीर सभा, १८ते२६सांखळी उपोषण. २१ तारखेला मौन मिरवणूक, दि. २६ ला दुपारी १२ नंतर कर्फ्यू होती. तरी गांधींच्या पुतळ्यापाशी उपोषणाला बसले विद्यार्थी. १३ नेत्यांना अटक, चारदिवस तुरुंगवास. मुले तुरुंगाला घाबरली, झोपणार कशावर? खाणार काय? पहिलाच अनुभव. पण मग सरावली. अनुभव घेऊन बाहेर पडली.

मग रोज नवीन एक शक्कल. ३० जानेवारीला गांधीजींच्या तीन माकडांची मूर्ती करून तीन मुले बसली गांधी चौकात. एकजण डोळे बंद करून—मला डोळे नाहीत, बरं झालं, नाहीतर गोळीबार बघावा लागला असता. दुसरा तोंड बंद करून — जास्त बोलू नका नाहीतर जनसत्तेच्या रमणलाल शेठसारखं तुरुंगात जाल. तिसरा कान बंद करून — मी गुजराथचा मालक आहे. माझ्या प्रजेला सांभाळतो आहे. मात्र विद्यार्थ्यांना राजकीय जाणीव विशेष नव्हती. कॉलेजेस दि. १ पासून सुरू झाली होती आणि तरी आंदोलन चालू ठेवण्याची भाषा होती.

बडोद्याचे वैशिष्टय म्हणजे येथे धान्याची मोठी गुदामे लुटली गेली होती. तेथे प्रत्यक्ष जाऊन लोकांशी बोलायचं ठरविलं. लाडवाडा भागात गेले. जी गोदामे लुटली तेथे पोलिसांचा आता पहारा होता. पोलीस काहीच सांगायला नाखूश होते. घरात शिरून लोकांना विचारायचा प्रयत्न केला 'मी येथे नव्हतोच.' 'रात्री झोपलो होतो' अशी उत्तरे ऐकायला मिळाली. माझ्या भोवती ,मुलेही जमायला लागलो. पोलीस येऊन रागावून गेला. १४४ कलम चालू आहे. लाठीमार करावा लागेल. शेवटी एका सायकलवाल्याच्या घरात आश्रय मिळाला. रात्री ७॥ वाजताची गोष्ट. जंगी टोळी करून लोक हिंडत होते. रस्त्यारस्त्यातून या भागात बरीच गोदामे आहेत. तेथे तेलाचे व तुपाचे डबे दोन तीन दिवसापूर्वीच खटाऱ्यात भरून आणलेले सर्वांनी पाहिले होते. जमावाने दगड मारून प्रथम गोदामाचे कुलुप तोडले. इतक्यात पोलीस आल्याची आवई उठली. लोक विखुरले. हाही भाग गल्ल्यागल्ल्यांचा. पुन्हा जमले आणि मग लुटालूट सुरू. मुस्लिमवाड्यातून मुस्लिम आले. शंभरजण असावेत. बहुतेक आजूबाजूच्या गोलवाड भागातले बॅकवर्ड लोक होते,

मजदूर. गल्लीतले कोणीच नव्हते– इति सायकलवाला. आश्चर्य म्हणजे लुटालूट चालू असेतोवर पोलीस अजिबात आले नाहीत. बऱ्याच वेळाने आले, तोपर्यंत हंगामा आटोपला होता. हवेत आवाज काढून निघून गेले. दुकानात थोडासा माल होता. पण त्यांनी पहाराही ठेवला नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी ११ पासून पोलीस पहारा बसला. याच इमारतीच्या मागच्या बाजूला धान्याचे गोदाम होते. त्या गल्लीत तर गहू इतका सांडला होता म्हणतात की समुद्राच्या वाळूतून चालावे तसे लोक गव्हातून चालत होते. दोन्ही दुकाने संग्रहखोरांची होती, काळा बाजार करणारांची, असं त्या सायकलवाल्याने आवर्जून सांगितले. गल्लीतले लोक बनिये होते. ते कशाला चोरतील ?

बडोद्यालाही गोळीबार वेडावाकडा, केवळ कर्फ्यू तोडली या सबबीखाली केला-असे लोकांचे म्हणणे आहे. आधी टिअरगॅस सोडून सूचना देणे वगैरे काहीच नाही. दोन तीन ठिकाणी बंदुकीच्या गोळ्यांच्या खुणा जपून ठेवलेल्या आढळल्या. एका घरात देवीच्या फोटोतच गोळी घुसलेली. त्याचवेळी त्या गल्लीत दोन लोक मृत्युमुखी पडले. आश्चर्य म्हणजे गोळी लागलेल्या लोकांना ताबडतोब हॉस्पिटलमध्ये पोचवायची जबाबदारी पोलिसांची. पण पोलीस जखमी लोकांना फरफटत नेऊन बाजूला ठेऊन द्यायचे. कर्फ्यू मध्ये रिक्षा शोधून हॉस्पिटलमध्ये घेऊन जाणेही कठीण. पोलीस फार क्रूर पद्धतीने वागत, असे प्रत्येकाचे म्हणणे दिसले. बडोद्यात आठजण गोळीबारात मारले गेले.

## एकेक कथा

आश्चर्य म्हणजे अहमदाबादमध्येही हीच हकीगत ऐकली, दुकाने लुटताना गोळीबार कधी झालाच नाही. काही वेळा एस. आर. पी. जवळ असले, तरी दुर्लक्ष करीत. किंवा क्वचित एस. आर. पी. लोकांना धान्य न्यायला मदत करीत. सनत मेहेतांनी एक कथा सांगितली की एका रजईवाल्याचे दुकान लोकांनी फोडले. एक दोन रजया जाळल्या. पोलीस आले. त्यांनी जाळणाऱ्यांना वेड्यात काढले. 'बाबांनो घेऊन पळा. जाळता काय!' हातोहात ५०–६० रजया पळविल्या गेल्या.

एकेक कथा ऐकताना मन विद्ध होत होतं. देशात विषमता भीषण आहे. दारिद्र्य माणसाला सैरभैर करतं. भुकेकंगाल, नंगी जनता जर एक दिवस रस्त्यात आली आणि अन्यायाचा बदला घेऊ लागली, कायदा आपल्या हातात घेऊन तर न्याय देणारे आपण कोण ?

येथेही 'मजूर महाजन' लढ्यापासून दूर होती. डाव्या पक्षांच्या कामगार संघटनांची कृति समिती थोडीशी प्रयत्नशील होती. कामगारांच्या सभा, २५ जाने. गुजराथ बंद, उपोषण वगैरे कार्यक्रम त्यांनीही आखले होते. पण कामगार एकूण थंड होता. दगडफेकीतही फार भाग घेत नव्हता. आणि घोषणांनी आकाश भेदून टाकीत नव्हता.

जनसंघाची आघाडी निराळी. आणि

बरीच स्ट्रॉंग होती. महिलांचा मोर्चा त्यांनीच आखला होता. विधानसभेच्या एकेका मतदारसंघाइतक्या भागाची एक मंडळ कमिटी नेमलेली असते. शिवाय प्रत्येक मतदान केंद्रासाठी स्थानिक समिती नेमली जाते. स्थानिक समितीचे कार्यकर्ते आपल्या भागात फिरून लोकांना संघटित करतात.

जनसंघाच्या मकरंदभाईंनी सूर वेगळा लावला होता. हरयाणा जर गुजराथला बाजरी पाठविणार नसेल तर गुजराथचे अंकलेश्वरहून पाठविले जाणारे पेट्रोलियम ऑईल बंद करावे. केंद्राची गुजराथवर कृपानजर नाही. नर्मदेचा प्रश्न अजून सोडवला नाही.

अन्नधान्याच्या बाबत सरकारचे धोरणच चुकीचे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मनात विकृती पैदा होते. भाव इतके कमी मिळतात तर तो अन्नसाठा बाहेर काढायलाच नाराज असतो. मग ही अशी कृत्रिम टंचाई होते.

'बरोबर आहे. कारण धान्य स्मगल करून त्याला थोड्या धान्याच्या विक्रीनेच इतका फायदा होतो. जितकी टंचाई जास्त निर्माण होईल तितका फायदा जास्त. मग श्रीमंत शेतकरी जास्त धान्य बाहेर काढील कशाला? थोडेसे धान्य कुजले, सडले तरी हरकत नाही. मला तर याला एकच उपाय दिसतो, की मनं विकृत होऊ नये म्हणून एकेका माणसाजवळ खूप मोठी जमीन ठेवायची नाही. जमिनीचे पुनर्वाटप करायचे. म्हणजे एका माणसाजवळ बाजारासाठी वाढीव माल खूप मोठ्या प्रमाणावर निर्माणच होणार नाही. त्यांची दावून ठेवण्याची शक्तीही जास्त नसेल. आपल्या गरजे इतके धान्य ठेवून बाकीचे तो आपोआप सरकारला देईल. कारण त्याच पैशातून त्याला कपडे, शिक्षण नवीन बी-बियाणं घ्यायचं असेल. आताही मध्यम शेतकरी, गरीब शेतकरी लवकर लेव्ही देतो. पण श्रीमंत शेतकरी अडवून ठेवतो. तुम्हाला काय वाटतं?' मी मकरंदभाईंना प्रश्न विचारला.

'बरोबर आहे तुमचं म्हणणं. पण सीलींगच्या कायद्याची कशी वाट लागते तुम्ही बघितलंच. तेव्हा लोकांचे स्वभाव लक्षात घेऊनच काहीतरी उपाय काढला पाहिजे. त्यासाठीच आम्ही खुल्या बाजाराचे तत्त्व स्वीकारतो.'

'लोकांचे स्वभाव म्हणजे कोणत्या लोकांचे? श्रीमंत लोकांचे? ज्यांच्या हातात आज भारतातील आर्थिक व्यवहाराच्या नाड्या आहेत त्यांचे?'

आमचे संभाषण येथेच थांबले. रविवारी दुपारी–३ फेब्रुवारीला मी बडोदा सोडले. खरं म्हणजे सुरतेला जायला हवे होते. राजकोटचे नाव वर्तमान पत्रातून बरेच गाजत होते. पण सर्व गुजराथभर आंदोलन याच पद्धतीचे होते. ते मुख्य करून जनतेचे आंदोलन होते. स्वयंभू होते. विद्यार्थ्यांचा पुढाकार खूप मोठ्या प्रमाणावर होता. जनसंघासारख्या संघटित पक्षाने काही ठिकाणी त्या आंदोलनामध्ये पुढाकार घेतला होता. चिमणभाई सरकारने लोकांना आपला संताप सनदशीर

मार्गाने व्यक्त करण्याची संधी न देता प्रथमपासूनच हे आंदोलन चिरडून टाकण्याचे धोरण ठेवले. धान्याचे ट्रक भरून पाठविण्याऐवजी केंद्रसरकारने आधी एस. आर पी. भरून रवाना केले. आणि आंदोलनाचा भडका आणखी जोराने उसळला. कॉंग्रेसपक्षाचे विघटन तर झालेच. पण मंत्रिमंडळालाही आच लागली. फूट पडली. चिमणभाई सरकारची आहुती कधी पडते याकडे लोकांचे लक्ष आता लागले आहे. आज तरी लोक म्हणताहेत—भ्रष्टाचारी सरकारला हटविल्याखेरीज आम्ही आता थांबणार नाही, थांबणार नाही, थांबणार नाही.

यायच्या दिवशीच भितीवर एक सुंदर घोषणा वाचायला मिळाली. त्यामध्ये गुजराथच्या परिस्थितीचं उत्तम चित्र उमटलंय—

गोली चलेएगा तो खून बहेगा ।
रोटी देगा तो खून बनेगा ।

# समारोप

तर या भेटीतून निष्कर्ष काय निघतात ? गुजराथ सरकार खरोखरीच इतरांपेक्षा जास्त भ्रष्टाचारी आहे का? गुजराथमध्ये खरोखरच धान्यटंचाई आहे का ? असलीच तर ती नैसर्गिक आहे की मानवनिर्मित आहे ? गुजराथचा विद्यार्थी राजकीय दृष्ट्या जागृत झाला आहे की तो मौज म्हणून, थ्रिल म्हणून या आंदोलनामध्ये भाग घेतो आहे ? महागुजराथसारखे सर्वपक्षीय, सर्वव्यापी आंदोलन या स्वरुपात हे आंदोलन उभे राहील का ?

माझ्या मते गुजराथ सरकार काही खास भ्रष्टाचारी नव्हे. इतर राज्यातून ज्या प्रमाणात देवाण घेवाण चालते त्याच प्रमाणात येथेही चालते. एक गोष्ट खरी. पूर्वी लाचलुचपतीची क्षेत्रे कमी होती. आता दिवसेंदिवस सरकार जितक्या अधिक क्षेत्रात आपला तावा ठेवू पहातंय तितक्या अधिक क्षेत्रात लाचलुचपतीचे विष पसरत चाललंय. एखाद्याकडून खराब गहू लेव्ही म्हणून घेतानाही सरकारी अधिकारी पैसे मागतो. ‘ तुझा गहू नाहीतरी बाजारात कोण विकत घेईल ? मी विकत घेऊन उपकार करतोय. त्याचा मोबदला दे. ’ आणि एखाद्या शेतकऱ्याला लेव्हीमध्ये गहू द्यायचा नसेल तरी ठीक आहे. पैसे काढ, म्हणजे सूट, सवलत. तर आता हे भ्रष्टाचार प्रकरण अधिक कॉन्सनट्रेट होतंय एवढंच. सरकारने सांगायचं जमीन मर्यादा बिल आम्हाला आणलंच पाहिजे. पुरोगामी प्रतिमा कायम ठेवण्यास अत्यंत आवश्यक. पण घाबरू नका,इतक्या पळवाटा ठेवतो कायद्याच्या. तुम्ही खुशाल कोर्टात जा. आणि जमिनी कोर्टात भिजत पडू द्यात. कायद्याच्या चरकात गुंतू देत की जमीनदार, श्रीमंत

शेतकरी सगळे सरकारच्या खिशात किंवा सरकार त्यांच्या खिशात म्हणा. थोडक्यात केंद्रीय सरकारचीच छोटी आवृत्ती गुजराथ सरकार.

गुजराथ धान्याच्या बाबतींत तुटीचे राज्य म्हणूनच प्रसिद्ध आहे. यंदाच्या आकड्याप्रमाणे १९७२–७३ साली गुजरायेत २०·९ लाख टन धान्याचे उत्पादन झाले आणि गुजराथची गरज ४३·११ लाख टन धान्याची आहे. म्हणजे २२ लाख टन तूट नैसर्गिकच आहे. जूनपर्यंत केंद्राकडून सरकारला १ लाख ५० हजार टन धान्य महिन्याला मिळत होतं आणि जानेवारीमध्ये परिस्थिती इतकी वाईट असतानासुद्धा फक्त ४०,००० टन धान्य केंद्राकडून आलं. अच्छा, राज्याची धान्य मिळकतीची जबाबदारी कितपत पार पडली? गुजराथ राज्याला ५०,००० टन तांदूळ जमवायचा होता. त्यापैकी फक्त २०,००० टन आतापर्यंत जमलाय आणि बाजरी १ लाख टन जमवायची होती. त्यापैकी फक्त १८,००० टन जमविली गेली. म्हणजेच केंद्राला दोष देता देता गुजराथ सरकारनेही आपली जबाबदारी टाळायचाच प्रयत्न केला. भुईमुगाचे पीक यंदा फार छान आले. पण तेलव्यापाऱ्यांशी सौदा करून तेलाचा व्यापार खुला ठेवला आणि स्थानिक बाजारातील किंमत वाढविली.

बार्डोलीचा प्रसंग चिमणभाईंनी वर्गसंघर्ष अशी जाहिरात करून गाजविला. व आपण दलितांची, शेतमजुरांची बाजू घेतो आहोत असं भासविले. पुष्कळांची अशीही समजूत आहे की, आताच्या आंदोलनाला सुरुवात तेव्हापासून झाली. हे चुकीचे आहे. तो प्रसंग डिसेंबरमध्ये घडला.

बार्डोली हा दक्षिण गुजराथमधील सुपीक भाग. उकाई धरणाचे पाणी या भागातल्या शेतकऱ्यांना मिळाले. धरणाखाली ज्या आदिवासींची जमीन गेली त्यांना बिचाऱ्यांना दूर खडकाळ जमिनीवर जाऊन रहावे लागले. सध्या या भागात आदिवासी कुटुंबे जी शेतमजुरी करतात त्यांचे व जमीनमालक शेतकरी कुटुंबाचे प्रमाण ४ : १ आहे. विषमता बरीच आहे. धरणाच्या पाण्याखाली येथील शेतकरी दोनदा पीक काढतो. बरेचजण परदेशी वगैरे जाऊन आलेले आहेत. काहींकडे ट्रॅक्टर आहेत, फ्रिज, ट्रान्झिस्टर वगैरे प्रतिष्ठेची साधने तर खूपच जणांकडे आहेत. या श्रीमंत शेतकऱ्यांची संघटना ही ' खेडुत समाज. ' त्यांनी भाताची लेव्ही द्यायचे नाकारले. त्यांचे म्हणणे, आम्ही सरकारला लेव्हीपेक्षा जास्त भात देऊ. पण आम्हाला सक्ती नको. ' समजुती ' हवी. सरकारने आमची शक्ती मान्य करून, तेलवाल्यांशी जशी समजुती केली तशी आमच्याशी करावी. आमच्या दयाबुद्धीला आवाहन द्यावे. त्यांनी अँन्टिलेव्ही आंदोलनाची घोषणा केली. सुरत जिल्ह्यातील फक्त तीन तालुक्यातील श्रीमंत शेतकऱ्यांनी. त्या भागातील शेतमजूर (हलपती) घाबरला. ह्या लोकांनी धान्य दडवून ठेवलं तर आपल्याला स्वस्त धान्याच्या दुकानात

धान्य मिळणार नाही. त्यांनी जाऊन त्यांची धान्यकोठारे लुटली. त्याचा राग येऊन पाटीदाराचे लोक हलपती सेवा संघाच्या सेक्रेटरीला–' अरविंद देसाईंना मारायला आले. गंमत म्हणजे हलपती सेवा संघ सत्तारूढ काँग्रेसचीच संघटना आहे. ती वर्गलढ्यावर विश्वास ठेवीत नाही. सर्वोदयासारखे तिचे काम. अरविंद देसाईला मारल्याचा बदला म्हणून हलपतींनी आपणहून जाऊन पाटीदाराचा (जमीनदार) खून केला. त्यामुळ गडबड उडाली. चिमणभाई सरकारने खेडुत समाजाच्या दोन पुढाऱ्यांना अंतर्गत सुरक्षा कायद्याखाली पकडले. खेडुत समाजाने धमकी दिली, जर आमच्या पुढाऱ्यांची सुटका झाली नाही तर गुजराथभर आम्ही आंदोलनाच्या ज्वाला पेटवू. अर्थात नंतर अमूल देसाई–अर्थमंत्री तेथे गेले. त्यांनी काही करार केले व शांतता प्रस्थापित केली. ते करार अर्थातच गुप्त राहिले. चिमणभाई त्यावेळी एवढे कठोर कसे काय वागले? त्याचे कारण एवढेच दिले जाते की मंत्रिमंडळातील एका गटाचा या खेडुत समाजाला पाठिंबा आहे. किंबहुना त्यांनीच हे अॅन्टिलेव्ही प्रकरण घडवून आणले. त्यांना आपले वर्चस्व दाखविण्यासाठी चिमणभाईंनी कठोर धोरण स्वीकारले आणि जरब बसविली. सध्याच्या आंदोलनात शेतकरीसमाज अगदी चूप आहे. शेतकऱ्यांच्या अॅन्टिलेव्ही भूमिकेचाही अभ्यास केला पाहिजे. ह्या शेतकऱ्यांचे उत्पादन वाढावे म्हणून सरकारने जनतेचा पैसा खर्च करून उकाई धरण बांधले. त्याचे पाणी या श्रीमंत शेतकऱ्यांना अतिशय स्वस्त दराने मिळाले. खते, जंतुनाशके, सुधारीत बी बियाणे वगैरे सरकारतर्फे सवलतीच्या दरात यांना दिले जाते. कर्जे दिली जातात. वर शेतीउत्पादनावर इन्कमटॅक्स लावला जात नाही. हे सर्व कशासाठी तर देशाच्या अन्नधान्य उत्पादनाची वाढ होऊन देश अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण बनावा यासाठी. तेव्हा या शेतकऱ्यांच्या उत्पादनावर सरकारने हक्क सांगितला आणि लेव्ही मागितली तर त्यात चूक काय आहे? आज सामान्य माणसाच्या, कामगारांच्या खर्चाचा सर्वात मोठा वाटा अन्नधान्यावर खर्च होतो. त्याला जर धान्यासाठी जास्त पैसे खर्च करावे लागले तर तो पगारवाढ मागेल. मग श्रमशक्ती महाग होईल. उद्योगधंद्यावर त्याचा परिणाम होईल आणि वस्तूंच्या किंमती महाग होतील. असे हे दुष्टचक्र आहे. यामध्ये बँकांचाही मोठ्या प्रमाणात हात आहे. व्यापाऱ्यांना धान्याचे साठे करण्यासाठी बँका कर्जे देत असतात. बँकांच्या उत्पन्नाचेही छोट्या मुदतीची कर्जे आणि त्यावरील व्याज हे महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांची व शेतकऱ्यांची अडवणुकीची शक्ती वाढते.

आता प्रश्न येतो विद्यार्थ्यांचा! वर्ग म्हणून विद्यार्थी उभा राहू शकत नाही. त्याला स्वतःला आता तरी हितसंबंध काही नाहीत. निवडणुकीला उमेदवार म्हणून उभे रहाण्याचीही फार थोड्यांची

पात्रता आहे. असे असताना विद्यार्थ्यांनी एवढ्या आवेशाने भाग कसा घेतला? यासंबंधी नुकतंच आग्नेय आशियातील विद्यार्थी चळवळीविषयी वाचायला मिळालं त्याची आठवण होत आहे. जपानचे पंतप्रधान तनाका नुकतेच थायलंड, इंडोनेशिया, मलेशिया येथील दौरा करून आले. त्यावेळी विद्यार्थ्यांनी प्रचंड निदर्शने केली. 'कुरूप जपानी' 'आर्थिक साम्राज्यवादी' या शब्दात त्यांचा धिक्कार केला. तेथील विद्यार्थ्यांमध्ये एक प्रचंड राष्ट्रवादी भावना निर्माण होऊ बघत आहे. आतापर्यंत या देशातील उच्चभ्रू राज्यकर्ता वर्ग प्रत्येक बाबतीत पाश्चात्यांचे अनुकरण करीत आला. चैनीची रहाणी, पाश्चात्य चालीरिती, आर्थिक व्यवहारावर पाश्चात्य कंपन्यांचे वर्चस्व. कॉलेज विद्यार्थीही याच वर्गातून येत. तेथील मातीशी फटकून वागत. आताचा नवा विद्यार्थी ग्रामीण भागातून येऊ लागला. तेथले दारिद्र्य, विषमता याचे भान त्याला अधिक आहे. त्याला आपल्या देशाच्या समस्यांना उत्तर शोधावंसं वाटतं. तो आंदोलनं करतो ती केवळ फीवाढ नको, परीक्षा नको वगैरे क्षुल्लक, मागण्यासाठी नव्हे. तो आंदोलन करतो राज्यकर्त्या वर्गाने साधं रहावे. जपानचे आर्थिक वर्चस्व आम्ही सहन करणार नाही. जपानी कंपनीतील अधिकारी येथे येऊन उर्मटपणे वागलेले आम्ही चालवून घेणार नाही.तो दबाव आणतोय राज्यकर्त्यांवर, श्रीमंत लोकांवर–देशाचे हित बघा. स्वतःचे बघत बसू नका.

आजची गुजराथच्या विद्यार्थ्यांची मागणी या विद्यार्थ्यांच्या मागणीशी मिळती जुळती आहे का? भ्रष्टाचार बंद करा ही विद्यार्थ्यांची मागणी. रोटी द्या ही जनतेची मागणी. विद्यार्थी खरोखरच अशारीतीचे दडपण आणू शकत असतील तर विद्यार्थी शक्ती ही मोठी प्रभावी शक्ती ठरेल. याच विद्यार्थ्यांतून उद्याचे राजकारणी तयार होणार आहेत. त्यांच्याही लोकशाही निष्ठा अधिक प्रखर असतील. समाजजीवनाचे पहारेदार अशी भूमिका जरी विद्यार्थी बजावू शकला तरी फार महत्त्वाची कामगिरी होईल. भीती एवढीच वाटतेय की आपापली वर्ग भूमिका आणि वर्गमूल्ये सोडून देऊन विद्यार्थी किती काळ असा समाजप्रवाहापासून दूर राहू शकेल?

हे सर्व धागेदोरे लक्षात आल्यावर हे आंदोलन मला गुजराथसारखे सर्वव्यापी का होऊ शकणार नाही याची कारणे लक्षात येतात. चिमणभाई सरकार जाण्यास फक्त शहरातील काही लोकांनाच रस आहे. शेतकरी समाज हा अलिप्त आहे. शेतमजूर लोक अजून संघटित नाहीत. त्यांचा आवाज उमटत नाही. तेव्हा शहरी नोकरदार, छोट्या उद्योगधंद्यातील असंघटित तरुण कामगार आणि विद्यार्थी ह्या सध्याच्या आंदोलनातील शक्ती. मात्र गुजराथच्या अनुभवावरून इतर राज्यातील सरकारांनी बरेच शिकण्याजोगे आहे. मांडीखालचे आसन डळमळीत असताना, केवळ

स्वार्थ न साधता काही व्यावहारिक धोरणे घेऊन, सतत जनतेला सामोरं जाऊन, पोलिसी सामर्थ्यावर जास्त भर न देता सत्ता सांभाळली तरी पुरे आहे. नाहीतर साऱ्या भारतभर अशा तऱ्हेचे असंघटित उद्रेक व्हायला वेळ लागणार नाही.

□

# दैनंदिनी

१ जाने : सुरक्षा कायद्याखाली १५ व्यापारी पकडले.

४ जाने : खेडूत समाजाच्या दोन नेत्यांना भा. सं. कायद्याखाली पकडले. बार्डोली पेटली. सुरतेला दंगलीचे लोण पोचले.

४ जाने : एल, डी. इंजिनिअरींग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी बस जाळण्याचा प्रयत्न केला. अन्नखर्च वाढला म्हणून निषेध.

५ जाने : ३२६ विद्यार्थ्यांना दंगलीनिमित्त अटक.

५ जाने : खाडिया भागात दगडफेक, जनसंघाच्या सभेनंतर घडलेला प्रसंग. जैतपूर येथील पोलिसी अत्याचाराचा निषेध करण्यासाठी सभा.

५ जाने : गोमतीपूर येथे भाववाढ थांबविण्यासाठी कॉंग्रेसने आयोजित केलेल्या सभेवर दगडफेक. जनसंघाचे पाठीराखे त्यात होते.

७ जाने : शाक कॉलेजेस बंद. मंत्र्यांच्या गाडीवर दगडफेक. विद्यार्थ्यांनी बंदचा आदेश दिला.—अहमदाबाद

७ जाने : राजकोटमध्ये जनसंघाचा आदेश, बंद. जनसंघाने मिरवणूक काढली. दगडफेक, लाठीमार.

९ जाने : अहमदाबाद—जनता कर्फ्यू
चिमणभाईंची विद्यार्थ्यांशी बोलणी, हॉस्टेल्सना रेशन कोटा देऊ केला.

१० जाने : अहमदाबाद बंद आदेश, नवनिर्माणयुवक समिती. रात्री ११ ते सकाळी ८ कर्फ्यू. मजूरमहाजनचा बंदला प्रतिसाद नाही. हिंसा, अत्याचार.

११ जाने : अमूल देसाई अर्थमंत्री यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले, आपण सर्व मिळून साठेबाजांना शोधून काढू या. जयप्रकाशांच्या संदेशाची आठवण ठेवा. क्लास रूम्स सोडा.

१२ जाने : बॉर्डर सिक्यूरिटी फोर्सला पाचारण. बडोद्यामध्ये लष्कर आले.

१३ जाने : मंत्र्यांच्या घरावर दगडफेक. गोळीबार. एकाचा मृत्यू.

१४ जाने : श्री. झाला यांच्याकडून पुरवठाखाते काढून घेतले.

१५ जाने : दुकानांची लूट चालूच. नवनिर्माण युवक समितीची स्थापना. कार्यक्रम जाहीर.

१६ जाने : २५ ला बंद. चिमणभाई राजीनामा देईतोवर शाक कॉलेज बंद ठेवण्याचा निर्णय. हुतात्मा दिन साजरा केला.

१७ जाने : अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सगळ्या मंत्र्यांना घेराओ करण्याचा निर्णय. ईश्वरभाई पटेल, उपकुलगुरूंना घेराओ.

१८ जाने : उमाकांत भांकड आणि मनीषी जानी या विद्यार्थी नेत्यांना सोडण्याचे मुख्यमंत्र्यांचे आश्वासन. तहाचे बोलणे.

१९ जाने : जामनगरमध्ये लष्कर, नवनिर्माण समितीने तह फेटाळला. आंदोलन चालू. मनीषी जानीचे सेनेट हॉलमध्ये भाषण.

२२ जाने : भ्रष्टाचाराची न्यायालयीन चौकशी करण्यासाठी लोकपाल नेमल्याचे जाहीर.

२४ जाने : प्रतिमा जाळल्या. गोळीबार. ५ मृत्यु.

२५ जाने : गुजराथ बंद, १४ ऑगस्ट, समिती व नवनिर्माण समितीचे आवाहन यशस्वी.

२७ जाने : लष्कर बोलावले अहमदाबादमध्ये.

२८ जाने : के. सी. पंत यांचे आगमन

• • •

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. PNC-68

# उत्तर प्रदेश निवडणूक पुरवणी

भारतीय राजकारणावर दूरगामी परिणाम करणाऱ्या या निवडणुका !

५ कोटी मतदार, ४२५ जागा आणि चार हजारावर उमेदवार !

भारतीय राजकारणाचे वारे उद्या कुठल्या दिशेने वाहणार ह्याचे उत्तर हे पांच कोटी मतदार देणार आहेत.
त्यासाठी नेत्यांचा, कार्यकर्त्यांचा (आणि अर्थातच पैशाचाही ! ) ओघ आज उत्तर प्रदेशाकडे वाहातो आहे.
कॉंगी, कॉंगो, भाक्रांद हे तीन कॉंग्रेस पक्ष एकमेकांविरुद्ध आणि त्याचबरोबर जनसंघाविरुद्धही.
आणि त्यातच सर्वांच्या बेरजा-वजाबाक्या चुकवणारे मुस्लिम लीगचे निवडणुकांतले पहिलेवहिले पदार्पण...

□

लखनौ, कानपूर, वाराणसी, अलाहाबाद, मेरठ, आग्रा, झाशी, दिल्ली...

माणूस प्रतिनिधी सु. ल. सोमण यांच्या या भागातील दौऱ्यावर आधारित खास पुरवणी पुढील अंकी.

या अंकाची किंमत एक रुपया.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर